Estd. 1994

ýý ãäìa'ãä ,ã½ãð¦ã½ã ,ãî¶ãì¦ãñ ýý

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's

# SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL

At/Post – Raypatan, Tal – Rajapur, Dist – Ratnagiri – 416 704

First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994

❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

❖ Best NSS Unit Award at University Level for the year 2017-2018 ❖ ISO 9001:2015 Certified

Principal Dr. M. A. Yellure
M.A., M.Phil, Ph.D. DIHT
Cell No. 9403392105, 9834468690

Telefax – 02353-299181
E-Mail – mhkcollegepachal@gmail.com
Web – www.khapnecollege.com

Permanent Affiliation No.
Aff-II./ICD/2015-2016/1121
dated 16th September 2015

3.3.2.1 Total number of books and chapters in edited volume/books published and papers in National and International conference proceedings year wise during the last five years.

## INDEX

| Sr no | Nameof theteacher | Title of the paper | Page no |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Pramod Meshram | Dr Babasaheb Ambedkar : Shaikshanik krantitil dipstamb | 01-04 |
| 2 | Dr.Vikas Patil | karmayogini Jankibai Akka Shetye | 05-09 |
| 3 | Dr.Vikas Patil | Khatabandh Vaividhyapurna ani Aashaysampanna - | 10-22 |
| 4 | Dr.Manohar Kondagurle | Dr.B.R. Ambedkar : A Library Reader and Educationist | 23-27 |
| 5 | Dr.Manohar Kondagurle | karla hyden : A first Women librarian of library of congress | 28-33 |
| 6 | Dr. pramod Meshram | Dakshin Koknatil Dhammadhil Budhanmadhil Parivarthan | 34-38 |
| 7 | Dr. Ashok Patil | Swatantra Bhartatil Shetkari Chalval | 39-45 |
| 8 | Dr. Pramod Meshram | Hindi Katha me Kishan Vimarshe | 46-54 |
| 9 | Dr. Vikas Patil | Katharang: Aashayache navarang ulghadnara sangrha | 55-67 |
| 10 | Dr. Vikas Patil | Swatentra senani: Aba Narkar | 68-71 |

Your Faithfully,

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

Principal

Scanned with OKEN Scanner

Estd. 1994

ýý äàÌâ²ää ,ä½äð¦ä½ä ,äÎ¶äi¦äñ ýý

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's

**SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL**

At/Post – Raypatan, Tal – Rajapur, Dist – Ratnagiri – 416 704

First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994

❖ Re-Accredited by NAAC with 'B' Grade ❖ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

❖ Best NSS Unit Award at University Level for the year 2017-2018 ❖ ISO 9001:2015 Certified

Principal Dr. M. A. Yellure
M.A., M.Phil, Ph.D. DIHT
Cell No. 9403392105, 9834468690

Telefax – 02353-299181
E-Mail – mhkcollegepachal@gmail.com
Web – www.khapnecollege.com

Permanent Affiliation No.
Aff-II./ICD/2015-2016/1121
dated 16th September 2015

# 3.3.2.1 Total number of books and chapters in edited volumes/books published and papers in national / international conference proceeding year wise during last five years

## YEAR 2019-20

Yours Faithfully

Principal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

Scanned with OKEN Scanner

- Snehavardhan Prakashan : No. 1283
- *'Contribution of Educationist from Maharashtra of Global Level'*
  *'Contribution of Padmavibhushan Shri Sharadchandraji Pawar in Various Fields'*
- 'महाराष्ट्रातील शिक्षण महर्षींचे जागतिक स्तरावरील योगदान'
  'पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार यांचे विविध क्षेत्रातील योगदान'
  (समीक्षा - संदर्भ)
- **Publishers & Printers :**
  **Dr. L. V. Tawre**
  Snehavardhan, 863 Sadashiv Peth,
  Behind Mahatma Phule Sabhagruh,
  Pune - 411 030. India
  Office : (020) 2447 25 49 / 2443 69 61
  Mobile : 9423643131 / 9075081888
  Email : snehaltawre@gmail.com


- © **S.R.I.**


- **First Edition :** 12th December 2019
  **21th International Interdisciplinary Conference, Pune**
- **Cover By :** Santosh Ghongade
- **Type Setting :** Sunita Parnerkar
- **Printed By :** Smita Printers, Pune
- **ISBN** 978-93-87628-73-8
- **Pages : 80**
- **Price :** ₹ 100
  $ 2


महाराष्ट्राला कणखर नेतृत्व देणारे

आणि

भारतावर कर्तृत्वाची मोहोर उमटविणारे

**माननीय नामदार शरदचंद्रजी पवार साहेब**

यांच्या

जीवन कार्यकर्तृत्वाला

आदरपूर्वक सस्नेह अर्पण...

- डॉ. स्नेहल तावरे

- श्री. संतोष खांडगे

Scanned with OKEN Scanner

१०. शरद पवार यांचे शेती विषयक कार्य - काकासाहे[illegible]रे/ ४८

११. पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार यांचे विविध क्षेत्रातील योगदान

- ज्योती सचिन दुर्ग-भेगडे/५०

१२. पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार यांचे विविध क्षेत्रातील योगदान

- सौ. अनुराधा संभाजी हुलावळे / ५५

१३ शिक्षण महर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख

- डॉ. मंदा माणिकराव नांदुरकर/ ५७

१४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक क्रांतीतील दिपस्तंभ - प्रा. प्रमोद एस. मेश्राम/ ६१

14. Contribution of Hon. Sharadchandraji Pawar Saheb for Maharashtra Socio- Economic Development

**- Mrs. Preeti Jangale/65**

15. The Versetile Personality

**- Rajendra Gulab Waje / 69**

16. Contribution of Maharashtra's Educationist at Global Education

**- Mrs. Renu Sharma / 73**

17. Contribution of Sharad Pawar in various Fields **- Kajal Gaikwad/77**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक क्रांतीतील दिपस्तंभ

**- प्रा. प्रमोद एस. मेश्राम**

**प्रस्तावना :**

भारतीय समाजात समताप्रविण परिवर्तन घडवून आणायचे असेल तर समाजातील सर्वांना शिक्षणाची दारे खुली केली पाहिजेत. समाजातील सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी व लोकशाही मूल्ये समाजात रूजविण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा अन्य उपाय नाही. याची जाणीव समाजातील अनेक समतावादी विचारांच्या, समताप्रविण सामाजिक अग्रगण्य धुरीणांना झाली होती. ज्यामध्ये बुध्द, कबीर, संत तुकाराम, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी प्रमुख कार्यप्रविण शैक्षणिक क्रांतीच्या दीपस्तंभांना मानाचे स्थान द्यावे लागेल. यात अजिबात दुमत नाही.

बुद्धांनी ज्ञानाला 'प्रकाश' असे संबोधिले. म्हणूनच त्यांनी शिक्षणाला अधिक महत्व दिले. अनेकांनी सामाजिक व शैक्षिणक कार्यात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र देऊन कृतिशील शैक्षणिक कार्याची आखणी करून त्याची अंमलबजावणही केली.

१) समाजाच्या परिवर्तनासाठी शिक्षणाचे महत्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात भगवान बुद्ध, संत कबीर व महात्मा फुले यांना गुरू मानले होते. बुद्धांच्या काळापासून भारतीय समाजात शैक्षणिक क्रांतीची सुरूवात झाल्याचे दिसून येते. बुद्धांच्या काळात देखील सर्वांना ज्ञानार्जन करण्याचा अधिकार नव्हता. हा अधिकार फक्त समाजात उच्चभ्रू वर्गाकडेच होता. विशेष महत्वाचे म्हणजे ब्राम्हण, क्षत्रीय व वैश्य वर्गातील स्त्रीयांना देखील शिक्षणाचा अधिकार नव्हता. शिक्षणाबाबत ब्राम्हणी धर्मातील या विषम सिद्धांताला बुद्धांनी प्रखर विरोध केला असल्याचे दिसून येते. 'पूर्वी



Scanned with OKEN Scanner

फक्त ब्राम्हण जात विद्या घेत होती. आम्हाला विद्या शिकता येत नाही. आम्हाला विद्या शिकण्याची इच्छा होती, पण ती आम्हाला ब्राम्हणांनी घेऊ दिली नाही. परंतु भगवान बुद्धाने हा दंडक मोडला.'१ समाजातील सर्वांनाच शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे असे स्पष्ट मत बुद्धांचे होते. म्हणूनच बुद्धांनी कोणताही जातीभेद न पाळता सर्वांनाच ज्ञान दिले.

पृथ्वीवर जन्मलेल्या सर्वच मानवी समूहाला शिक्षणाची आवश्यकता आहे. त्यांच्या परीवर्तनासाठी प्रत्येक व्यक्तीला ज्ञान घेण्याचा हक्क आहे. शिक्षण ही कुणाची एकाची मक्तेदारी नाही. अशा प्रकारचा सिद्धांत बुद्धांनी मांडला होता. त्यामुळे बौद्ध धम्मातील भिक्खू हे प्रज्ञावंत असल्याचे दिसून येते. धम्माने प्रेरीत झालेल्या बौद्ध भिक्खू संघांनी त्या काळात जागतिक दर्जाची अनेक मोठमोठी विद्यापिठे निर्माण केली होती. ज्यामध्ये तक्षशिला, नालंदा, नागार्जून, विक्रमशिला, उदंतपूरी, रत्नागिरी इत्यादी मोठमोठी विद्यापिठे निर्माण केली होती. त्यामुळे प्राचीन काळात शिक्षणाच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण करण्याचे बौद्ध धम्माचे योगदान महत्वपूर्ण आहे, आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुद्धाने आवाहन केले आहे.'२

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दुसरे गुरू संत कबीर यांनी समाजातील सर्वांना इतरांप्रमाणे शिक्षण मिळावे यासाठी आपल्या दोह्यातून समाजाला क्रांतिप्रविण शैक्षणिक मार्ग सांगितले. ते म्हणतात,

'पोथी पढी पढी जग मऊआ पंडित भया न कोई।
ढाँई अक्षर प्रेम का पढे सो पंडित होई।'३

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तिसरे गुरू जोतीराव फुले होत. ज्यांनी शिक्षण नसल्यामुळे समाजाची अधोगती झाली असे सांगितले. शिक्षणाचे महत्व सांगताना जोतिबा फुले म्हणतात की,

'विद्येविना मती गेली,
मतीविना नीती गेली,
नीतिविना गती गेली,
गतिविना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले,
इतके सारे अनर्थ, एका अविद्येने केले।'४

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान :**

शिक्षणाचे महत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ते महत्वाचे शस्त्र आहे. म्हणूनच ते म्हणतात की, 'शिक्षणाशिवाय समाजाला तरणोपाय नाही.' १९४६ साली त्यांनी पिपल्स



एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबई येथे 'सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ' आणि 'सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स' अशी दोन महाविद्यालये सुरू केली. याच सोसायटीमार्फत 'मिलिंद महाविद्यालया'ची स्थापना १९५० साली औरंगाबाद येथे केली. या परिसराला नागसेन परिसर असे नाव दिले. मिलिंद हे नाव औरंगाबादच्या महाविद्यालयाला का दिले हे सांगताना स्वत:हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'बौद्धधम्माशी सलग्न असलेले 'मिलिंद' हे नाव महाविद्यालयास देण्याचे दुसरे कारण असे की, विद्या ही अन्नासारखी सर्व मनुष्यास आवश्यक आहे. प्रत्येकाला तिचा लाभ झाला पाहिजे. हा उद्दात विचार पहिल्यांदा उद्घोषित केला असेल तर तो भगवान बुद्धानेच. तेव्हा ज्या असंख्य लोकांना कैक शतके अज्ञानात दडपून ठेवण्यात आले. त्यांना सुविद्य बनविण्याचा प्रारंभ करताना बुद्धाचे अथवा त्याच्या शिष्याचे नाव आठवावे हे स्वाभाविकच आहे.'५

१९४६ साली मुंबई येथे स्थापन केलेल्या महाविद्यालयाला सिद्धार्थ हे बुध्दांचे आधीचे नाव त्यांनी का दिले असावे याचे कारण मूळातच हे आहे की, 'प्राचीन काळात बुद्धांनी शैक्षणिक क्रांतीची सुरूवात केली होती.'

अनेक समाजाच्या प्रगतीसाठी अस्पृश्यांतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाविद्यालयाच्या निर्मितीतून खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीला सुरूवात केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांना १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा देऊन अस्पृश्यता एका झटक्यात टाकून दिली. बौद्ध झालेल्या समाजाने शिक्षणाची कास धरली व केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या अनेक महत्वपूर्ण जागा त्यांनी आपल्या बुद्धीने मिळविल्या.

बौद्ध झालेल्या अनुयायावचे साक्षरतेचे प्रमाण १९६१ साली १५.६९ टक्के होते, मात्र २००१ च्या जनगणनेनुसार त्यांचे शिक्षणाचे प्रमाण ७२.७ टक्के एवढे वाढले असल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे मूलमंत्र समाजाला देऊन त्यांच्या प्रगतीसाठी पी.इ.एस. सोसायटीची स्थापना केली. परंतु काही लोक असे म्हणतात की, मागासवर्गीयांना शैक्षणिक सवलती मिळाल्यामुळे हे लोक शिकू लागले, परंतु त्यांचे मत योग्य नाही. भारतात अनेक मागासवर्गीय जाती आहेत. त्यांना शिक्षण घेण्याची मनाई नाही. त्यांनाही अनेक सवलती मिळतात. परंतु बौद्धांशिवाय अनेक मागासवर्गीय समाजाची प्रगती झाली नाही. यासंबंधी अनेक प्रकारची उदासिनता त्याच्यांत आहे. परंतु शिक्षणासंबंधी बौद्ध समाज अधिक जागृत असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मूलमंत्रामुळेच बौद्ध समाज अधिक प्रमाणात शिक्षणाकडे वळला आहे ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे.

शिक्षणामुळे नवनवीन ज्ञानाच्या कक्षा रूंदावत असल्याने अनेक साधनांचा उपयोग केल्यामुळे, नवनवीन पुस्तकांची, नवीन ज्ञानाची निर्मिती होत आहे. थोडक्यात असे की, पुस्तकी ज्ञानामध्ये या समाजाने क्रांती केली आहे. त्यामुळे अनेक महत्वाच्या ठिकाणाहून पन्नास कोटीपर्यंत पुस्तकांची विक्री होत आहे. शिक्षणामुळे माणूस निबुद्ध बनतो. या संबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'उपासमारीने शरीराचे पोष कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणा अभावी तो निर्बद्ध झाल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो. अर्थात, मुलाच्या शरीराची आणि बुद्धीची शक्य तेवढी चांगली जोपासना करणे प्रत्येक आईबापाचे कर्तव्य आहे.'६ हे आपल्या उद्धारकर्त्यांचे मत बौद्ध समाजाने स्विकारल्यामुळेच जागतिक दृष्टीकोनातून जीवनाच्या सर्वांगिण अंगात बदल घडून आला आहे.

शिक्षणामुळेच व्यक्तींचे विचार बदलण्यास सुरूवात होते. याची जाणीव निर्माण झाल्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या महाविद्यालयातून लाखो लोकांनी शिक्षण घेऊन अत्यंत महत्वपूर्णरीत्या स्वत:मध्ये बदल घडवून आणला आहे.

**सारांश :**

प्राचीन काळापासून ज्या समाजाला शिक्षणाची बंदी होती त्या समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक काळात महाविद्यालयाची स्थापना करून शैक्षणिक कार्यात, समाजाच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण योगदान केले. त्यामुळेच शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य समाजाच्या उद्धारासाठी दिपस्तंभासारखे उभे असल्याचे दिसून येते.

ॐॐ

**संदर्भ ग्रंथ :**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-१, उच्च आणि तंत्र विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, २००२, पृ.५२३
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-३, उच्च आणि तंत्र विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई
३) डॉ. रघुवंशी, 'कबीर एक नई दृष्टी, लोकभारती प्रकाशन', ईलहाबाद, पृ. ४३
४) य. दि. फडके (संपा.), 'महात्मा फुले समग्र वाडमय', महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९१, पृ. २४३
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषण खंड-३, पूर्वोक्त पृ.४५७
६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'बहिष्कृत भारत आणि मूकनायक', महाराष्ट्र शासन मुंबई, पृ.६६


IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri



Scanned with OKEN Scanner

- स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १३०२
- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील स्त्री कर्तृत्वाचे योगदान
  भाग - ३
  (समीक्षा - संदर्भ)
- प्रकाशक आणि मुद्रक
  डॉ. एल.व्ही. तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ,
  महात्मा फुले सभागृहामागे, पुणे ४११ ०३०
  स्थिरसंवाद: (०२०) २४४७ २५ ४९ /२४४ ३६ ९६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१/९०७५०८१८८८
  ईमेल : snehaltawre@gmail.com
- मुखपृष्ठ : संतोष धोंगडे


- © S.R. I.


- प्रथमावृत्ती : १५ डिसेंबर २०१९
  २२ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे
- अक्षरजुळणी : सुनीता पारनेरकर, पुणे
- मुद्रणस्थळ : स्मिता प्रिंटिंग प्रेस, पुणे
- ISBN 978-93-87628-75-5
- पृष्ठसंख्या : १८१
- मूल्य : ₹ २५०
  -$ 3


*विश्वाची मूलाधार असलेल्या,*

*कोणत्याही परिस्थितीला खंबीरपणे*

*तोंड देणाऱ्या, अष्टावधानी असलेल्या*

*समस्त स्त्री शक्तीला*

*आदरपूर्वक सस्नेह अर्पण...*

- डॉ.स्नेहल तावरे
- डॉ. शिवलिंग मेनकुदळे
- डॉ. संजय नगरकर
- डॉ. सविता पाटील

Scanned with OKEN Scanner

११. अहिल्याबाई होळकर यांचे योगदान - प्रा. कल्पना रोकडे ..४६
१२. कर्तृत्ववान महिला : सावित्रीबाई फुले - प्रा. नंदकुमार उदार ..५०
१३. रझिया सुलतान - प्रा. सुनीता भोसले ..५३
१४. महाभारतकालीन शकुंतलेचा आदर्श - प्रा. दिलीप कोने ..५७
१५. भारतीय स्त्री इतिहासकार : रोमिला थापर - प्रा. सविता वीर ..६१
१६. जागतिक आयटी क्षेत्रातील सामाजिक महिलांचे जीवनातील योगदान - प्रा.मयूर माळी ..६५
१७. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : सामाजिक दृष्टिकोनातून अवलोकन - प्रा. विलास नाबदे ..६९
१८. इंदिरा गांधींचे भारतीय शेतीसाठीचे योगदान - प्रा.रमेश थोरात ..७३
१९. भारतीय आयटी क्षेत्रातील महिलांचे सामाजिक जीवनातील योगदान - प्रा.गौरी पवार ..७७
२०. महाराष्ट्रातील समाज सुधारणेत स्त्रियांचे योगदान - प्रा.संदीप नन्नावरे ..८०
२१. सुनीता अरळीकर यांचे सामाजिक आणि वाङ्मयीन योगदान - प्रा. महादेवी धारक ..८४
२२. विज्ञान जगतातील आदर्श स्त्री - डॉ. रोझलिंड फ्रँकलिन - प्रा. योगेश्री कोकरे ..८८
२३. क्रांतिज्योती सावित्रीबाई रोडे यांचे शैक्षणिक कार्याचा अभ्यास - प्रा.विकास टकले ..९२
२४. मिसेस फरार यांचे स्त्री सुधारणा विषयक कार्य - प्रा. अमोल बोत्रे ..९६
२५. शास्त्रीय संगीत क्षेत्रातील गोमंतकीय स्त्रियांचे योगदान - प्रा. विनायक बापट ..९९
२६. गोवा मुक्तिसंग्रामात शारदाताई सावईकर व सिंधुताई देशपांडे यांचे योगदान - प्रा.स्नेहा जांबोटकर ..१०३
२७. शीला नाईक कोळंबकर आणि डॉ.जयंती नाईक यांचे कोंकणी साहित्य क्षेत्रातील योगदान - प्रा.विदिता महाले ..१०७
२८. स्त्री समाजसुधारक ताराबाई शिंदे - प्रा. रघुनाथ घाडगे ..१११
२९. भारतीय महिला क्रिकेट मधील चमकता तारा : मिताली राज - प्रा. एकनाथ झावरे ..११४
३०. व्रतस्थ कर्मयोगिनी : राजमाता अहिल्याबाई होळकर - डॉ.अरुण कोळेकर ..११८
३१. समाजसुधारक : रमाबाई रानडे यांचे महिलांच्या हक्कांसाठीचे योगदान - प्रा.आसावरी शेवाळे ..१२२
३२. स्त्री शिक्षणाची क्रांतिज्योती : सावित्रीबाई ज्योतिराव फुले - प्रा.प्रदीप एडके ..१२६
३३. बहिणाबाईंची कविता - प्रा. विलास सुर्वे ..१३०
३४. बहिणाबाईंचे मराठी साहित्यातील योगदान - प्रा. लक्ष्मी पवार ..१३३
३५. नजुबाई गावित यांचे आदिवासी क्षेत्रातील योगदान - प्रा.निलेश लंगोटे ..१३७
३६. कर्मयोगिनी जानकीबाई तथा आक्का शेटये - डॉ. विकास पाटील ..१४१
३७. आदिवासींची सेवा करणाऱ्या सेवाव्रती : डॉ. राणी बंग - प्रा.विशाखा हेंद्रे ..१४५
३८. राजमाता अहिल्याबाई होळकरांचे सामाजिक-धार्मिक योगदान - प्रा.पोपट झोंबाडे ..१४९
३९. समाजाभिमुख कार्यकर्ती : निरूपमाताई - प्रा. श्रेया चौधरी ..१५३
४०. संत वाटिकेतील जाईची वेल : संत जनाबाई - प्रा.दादा साठे ..१५७
४१. महाराष्ट्रातील कृषिक्षेत्रात महिलांचे योगदान : एक अभ्यास - प्रा. तुकाराम आघाव ..१६१

पाचल

Scanned with OKEN Scanner

४२. आद्य क्रांतिकारी चळवळीच्या पहिल्या स्त्री जनक महिला 'मादाम भिकाजी रुस्तम कामा' - प्रा.चारुशीला लोखंडे ..१६५
४३. श्रीमती इंदिरा गांधी यांची भारताच्या आर्थिक विकासात भूमिका - प्रा.अनिल कांबळे ..१६९
४४. पंडिता रमाबाई यांचे स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य - प्रा. मिलिंद घाडगे ..१७३
४५. महाराष्ट्रातील दिव्यांग सक्षमीकरणासाठी नसीमा हुरजुक यांचे योगदान - प्रा. वाल्मिक कीर्तीकर..१७६
४६. मातोश्री विमलाबाई पंजाबराव देशमुख एक समर्पित जीवन - डॉ मंदा नांदुरकर ..१८०

# कर्मयोगिनी जानकीबाई तथा आक्का शेटये

- डॉ. विकास पाटील

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतात अनेक समाजसुधारकांनी समाज-सुधारणेचे काम केले. या समाजसुधारकांच्या खांद्याला खांदा लावून काही महिलांनीही समाजसुधारणेचे कार्य केले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव यामध्ये अग्रक्रमाने घ्यावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू होते. पुरुषांबरोबरच अनेक स्त्रिया या कार्यात सहभागी होत्या.या कार्यात हिरारीने सहभागी होणा-या पुरुषांबरोबरच स्त्रियांचीही इतिहासाने दखल घेतली. ग्रामीण भागात समर्पण भावनेने काम करणा-या स्त्रियांची मात्र इतिहासात ना दखल घेतली गेली, ना त्यांच्या वाट्याला कोणतेही मानसन्मान आले. असेच मोठे समाजकार्य करून सगळ्या मानसन्मानापासून वंचित राहिलेले नाव म्हणजेच जानकीबाई शेटये उर्फ आक्का.

जानकीबाई शेटये उर्फ आक्का या फक्त स्वातंत्र्य सैनिकच नव्हत्या तर त्यांचे समग्र जीवन सेवाभावी वृत्तीने समाजाला अर्पण केले होते.

**बालपन व विवाह :**

श्रीमती जानकीबाई तथा आक्का शेटये या थोर स्वातंत्र्यसैनिक व सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते श्री. आबा नारकर यांच्या मोठ्या भगिनी होत. आक्कांसह पाच बहिणी व दोन भाऊ असा त्याचा मोठा परिवार होता. आक्कांचा जन्म १९०२ मध्ये सह्याद्रीच्या कुशीतील पाचल गावी झाला. त्यांचे वडील बाळकृष्ण नारकर हे एक प्रतिष्ठित सत्प्रवृत्तीचे व्यापारी होते. त्यांचे खूप मोठे एकत्र कुटुंब होते. त्या काळात मुलींच्या शिक्षणाची कल्पना रुजली नसल्याने आक्का निरक्षरच राहिल्या. तत्कालीन रितीरिवाजाप्रमाणे आक्कांचा विवाह त्यांच्या बालपणीच म्हणजे वयाच्या १०-१२ व्या वर्षी लावून दिला. दुर्देवाने आक्कांना वैधव्य आले. वाकेड येथील श्री. गंगाराम शेटये हे त्यांचे पती. लग्नानंतर ८-९ वर्षातच गेल्याने घरी सधनता असूनही आक्कांचा सासुरवासाला सुरू झाला. शेवटी या सासुरवासाला कंटाळून आक्का माहेरी पाचलला आल्या. आपण स्वावलंबी असावे म्हणून त्या मुंबईला चुलत्याकडे विड्या वळण्याचे काम करू लागल्या. येथे त्यांनी स्वतःला धार्मिक कार्यात गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला. अध्यात्माकडे

ओढा लावून घेतला. कुशाग्र बुद्धी, समाजसेवेची असणारी आवड त्यांना स्वस्थ बसू देईना. पुढे त्यांचे बंधू स्वातंत्र्य चळवळीचे लोण पाचलला घेऊन आले. आबा बनारसहून स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होण्यासाठी पाचलला आलेत. पाचलला त्यांनी गावातील मुलांना आश्रमीय शिक्षण देण्यासाठी आनंदमठ नावाचे वसतिगृह काढले. आबांनी आक्काला या विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी या वसतिगृहात आणले. तेथून त्याच्या विचारातही बदल होऊ लागला.

**अप्पासाहेब पटवर्धनांचा सहवास व शिक्षण :**

सुरवातीच्या काळात आक्का या कर्मठ विचारांच्या होत्या. त्यांचे बंधू आबा नारकर यांचा चाललेला समानतेचा लढा पाहून त्या बदलत गेल्या. पुढे काही दिवस आबांनी आक्काला कोकणचे गांधी म्हणून ओळखले जाणारे अप्पासाहेब पटवर्धन याचेकडे पाठविले अप्पांनी त्यांना लिहायला व वाचायला शिकवले. तेथे गांधी विचारांचा प्रभाव आक्कांवर पडला. स्वयंभू , स्वतंत्र विचार करणारी अक्का येथे घडत गेली. आश्रमातील अनेक कार्यकर्त्यांचे विचार, भाषणे, त्याची समाजकार्याची गोडी, सामाजिक व राजकीय विचारांची बैठक याचा आक्कांवर खूप मोठा प्रभाव पडला. पुढे अप्पासाहेब पटवर्धन यांची आई आजारी पडल्यावर अप्पासाहेबांनी आक्काला बोलावून घेतले. आक्कांनी त्यांची शुश्रुषा उत्तम प्रकारे केली.

**सत्याग्रहात सहभाग :**

याच काळात रत्नागिरी जिल्ह्यात सुरू असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात अप्पासाहेब पटवर्धन यांच्या विचाराने अनेक स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. १९४२ च्या आंदोलनात पाचल परिसरातील आबा नारकर व त्यांच्या सहका-यांनी भूमिगत राहून खूप मोठे आंदोलन सुरू केले होते. आक्कांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता . पोलिसांच्या धाडीला निर्भयतेने तोंड देण्याचे शिक्षण स्त्रियांना आक्कांनी दिले. पुढे वाकेड येथील दारूच्या गुत्यावर पिकेटिंग करून त्यांनी सत्याग्रह केला. त्यात त्यांना चार महिन्याची शिक्षा झाली. तुरुंगातून बाहेर आल्यावर आक्का गावोगावी फिरून चळवळीचे महत्त्व पटवून देत होत्या.

**सासवडच्या कस्तुरबा केंद्रात नर्सिंगचे शिक्षण :**

स्वयंभू, स्वतंत्र विचारांच्या आक्कांना अप्पासाहेब पटवर्धन यांनी पुणे जिल्ह्यातील सासवड येथे कस्तुरबा ट्रस्टच्या प्रशिक्षण केंद्रात नर्सिंगचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले. तेथे प्रवेश घेणा-या स्त्रिया शिक्षित होत्या. अशिक्षित आक्कांना प्रवेश नाकारला गेला. त्यावेळी अप्पांच्या शिफारसीने आक्कांना प्रवेश मिळाला. यासंबंधी माहिती देताना 'सहयगिरीतील गांधी' या आबा नारकर यांच्या चरित्र ग्रंथात स्नेहल नेने म्हणतात, खरे तर या प्रशिक्षणास आलेल्या सर्व स्त्रिया शिक्षित होत्या काही तर पदवीधर होत्या. तशी अटच होती. पण पु. अप्पासाहेब



पटवर्धनांनी 'सनदला पदवीची गरज नाही' असे सांगून माणिकताई पटवर्धन, प्रेमाताई कंटक यांना पत्र लिहिले व आक्कांना प्रवेश मिळाला.[१] नेनेंच्या मते आक्कांना या प्रशिक्षणासाठी अप्पासाहेबांचीच मदत झाली. अप्पासाहेबांनी आक्कांच्या मनातील सेवा वृत्ती, समाजाप्रतीची तळमळ पाहिली होती. म्हणूनच त्यांनी आक्कांना या विद्यालयात प्रवेश मिळवून दिला. सासवड येथे आक्कांनी सेवेचे साधन म्हणून नर्सिंगचे शिक्षण पूर्ण केले व भिलवडी येथे त्यांनी काही दिवस काम केले. १९४८ मध्ये त्या पुन्हा पाचलला आल्या .

**यशस्वी परिचारिका म्हणून कार्याला सुरुवात व मानव सेवेचा आरंभ :**

१९४८ मध्ये पाचल परिसर म्हणजे खूपच दुर्गम व सोयी, सुविधापासून वंचित आसलेला मागास प्रदेश म्हणून ओळखला जात होता. आजही या परिसरातील वाडीवस्तीवर म्हणावे असे परिपूर्ण रस्ते पहायला मिळत नाहीत. त्या काळात ना रस्त्यांची सुविधा ना नदी ओढ्यावर पूल अशी स्थिति होती. नेहमीच पाचवीला पुजलेले दारिद्र्य आणि हाताला काम नाही. अशी स्थिति त्यामुळे घरचा पुरुष मुंबईला असे. आशा या काळात पाचल येथे आक्कांनी १९४८ मध्ये कस्तुरबा केंद्र सुरू केले. या क्रेंद्रा मार्फत पाचल पंचक्रोशीतील लोकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या. या काळात आक्कांनी अनेक महिलांना पुनर्जन्म दिला. अनेक बाळंतपणात अडलेल्या स्त्रियांची आक्कांनी योग्य प्रकारे सोडवणूक केली. बौद्ध, मुसलमान, धनगर, गरीब--श्रीमंत असा कोणताही भेदभाव तिने केला नाही. ऊन, वारा, पाऊस या कशाचीही पर्वा न करता ती या स्त्रियांच्या सोडवणुकीसाठी हजर व्हायची. अनेक स्त्रियांचे प्राण या कर्मयोगिनीने वाचवले. कोणत्याही वाहतुकीच्या सुविधा नसताना प्रसंगी बैलगाडीतून, अनेक वेळा मैलोन मैल अंतर चालत पार करून अनेक स्त्रियांच्या संकटात देवदूत म्हणून धावून आली. एक वेळ तर प्रचंड पाऊस पडत होता. पाचल लगत असणा-या तळवडे गावी एक महिला बाळंतपणात आडली होती. ती मरण यातना भोगत अखेरच्या घटका मोजत होती. पाचल आणि तळवडेच्या मध्ये असणा-या अर्जुना नदीने उग्ररूप धारण केले होते. अर्जुनेच्या दुथडी वाहणा-या त्या पात्रात उतरणे म्हणजे राजापूरच्या खाडीत जाऊन अरबी समुद्राला मिळणे असे होते. यावेळी पाचलला चवंडे नावाचा तरुण पट्टीचा पोहणारा होता. दोन्ही काठावर लोक श्वास रोखून उभे होते. आक्काला मरणासन्न स्थितीत असणारी ती स्त्री दिसत होती. आक्काने आपल्या प्राणाची पर्वा केली नाही. ती चवंडेच्या पाठुंगळी बसली. चवंडे महापुरात उतरला आणि लोकांच्या काळजाचा ठोका चुकला. श्वास रोखून धरले प्रवाहाबरोबर चवंडे ही जात होता. कधी चवंडेचे तर कधी आक्कांचे डोके वर दिसत होते. चवंडेने अर्जुनेच्या पाण्याचा तो वेगवान प्रवाह कापत आक्कांना पैलतीरावर नेले आक्काने त्याच अवस्थेत त्या आडलेल्या स्त्रीचे घर चालत गाठले त्या स्त्रीचे प्राण वाचवले.



Scanned with OKEN Scanner

मानवतेचा वसा आणि वारसा घेऊन आक्का अखेर पर्यंत अशा आडलेल्या स्त्रियांचे बाळंतपण करत राहिली. धनगरांच्या पाड्यावर अनेक किलोमीटर ती चालत गेली. महिला, लहान मुले, घरातील आजारी माणसांनवर उपचार करत राहिली. ब-याच वेळा तेथील परिस्थिती पाहून आपल्याच घरातील अन्न धान्य, कपडे या गोरगरीब स्त्रियांना ती देत होती. आयुष्याची २८ वर्ष आक्कांनी अशी या पाचल पंचक्रोशीत विनामूल्य आरोग्य सेवा दिली. जातपात, धर्म न पाहता विशाल मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांनी सेवा केली.

आक्काविषयी या परिसरातील थोर विचारवंत चंद्रकांत देशपांडे 'तुला दंडवत सुंदरक्का' या आक्काचा स्मृती ग्रंथात म्हणतात, तिच्या हृदयातील मातृभावना मात्र सदैव जागृत ठेवली होती. आणि ते मातृत्व तिने वैयक्तिक न ठेवता व्यापक आणि सार्वजनिक केलं होतं. आता परिसरातील भगिनी तिच्या मुली होत्या आणि पुरुष तिचे पुत्र यांचे भावनेने आक्का अखेरपर्यंत कार्यरत राहिली. आपलीच मुले, मुली तिने सर्वांना मानल्याने तिच्या मनात कधीही संकोच आला नाही. सर्वांवर तिने प्रेमाना उपचार केले.

**महिला सबलीकरणाचे कार्य :**

आक्कांना स्त्रियांविषयी प्रचंड आत्मियता होती. त्यांनी महिलाना एकत्र करण्यासाठी १९४३ मध्ये महिला मंडळ काढले. यामध्ये सहभागी असणा-या महिलांना त्यांनी अल्पबचत खाते उघडायला लावून काटकसर व बचतीचे धडे दिलेत. कस्तुरबा केंद्रात २-३ शिलाई मशीन होत्या. त्यांचा उपयोग करून महिलांना शिलाईचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिले. महिला मंडळात सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करून सर्व महिलांना जातिधर्माच्या चौकटीबाहेर पडण्यास प्रवृत्त केले. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले.

असे हे आक्कांचे व्यक्तिमत्त्व कोकणातील फणसासारखे वरून बोलणे खडबडीत, परंतु आतून मानवतेचा ओलावा असणारे. आपल्या सेवावृत्तीने व स्वतंत्र विचारांनी पाचल परिसर दीपवून टाकणा-या आक्कांच्या नशिबी मात्र मान-सन्मान आले नाहीत. त्यांच्या या कार्याची साक्ष देणारे एखादे स्मारक ही आज पाचल परिसरात नाही. अशा या असामान्य कर्तृत्वाच्या जगावेगळ्या आक्कांचे दर्शन घडविण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न.

ᘓᘓ

**संदर्भ ग्रंथ :**


१. सह्यगिरीतील गांधी :- स्नेहल नेने, आबा नारकर स्मृती प्रकाशन २२ डिसेंबर २०१३ पान नं. ९८-९९.

२. तुला दंडवत, सुंदराक्का संपादिका- शांता नारकर, प्रा. शांता सहस्रबुद्धे प्रथम आवृत्ती पान नं. ७३.

३. सह्यगिरी वार्षिक अंक २०११--१२.


IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri



Scanned with OKEN Scanner

Sahityaband/ Smiksha
Editor : Dr. Satish kamat

साहित्यबंध
संपादक : डॉ. सतीश कामत

• © सर्व हक्क सुरक्षित

• प्रकाशक :
सुमती लांडे
शब्दालय प्रकाशन
पोस्ट बॉक्स नं. १०, वॉर्ड नं. ७
श्रीरामपूर - ४१३ ७०९
मोबाईल- ९८२२००८७९६, ९८२२५२५४४४

• मुखपृष्ठ रचना : शाल्मल

• प्रकाशन क्रमांक : ५४१
पहिली आवृत्ती : डिसेंबर २०१९

• अक्षर जुळणी : अक्षर कॉम्प्युटर्स,
• मुद्रक : स्मिता प्रिंटर्स

• मूल्य: १५० रुपये

ISBN: 978-81-944176-3-7

email-shabdalaya@gmail.com
www.shabdalaya.com www.facebook.com/shabdalaya
Bookganga, Flipkart, Amazon Kindle

या वेबसाईटवर पुस्तके व ई-बुक्स ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध

समीक्षात्मक लेख देऊन सहकार्य करणाऱ्या सर्व लेखकांचे मन:पूर्वक आभार. या ग्रंथाची कल्पना बोलून दाखवल्यावर पाठीवर थाप मारून 'आगे बढो' असा प्रोत्साहनपर सल्ला देणारे मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. धनाजी गुरव, चर्चेदरम्यान मौलिक सूचना करणारे डॉ. गिरीश मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील आणि माझ्या लेखनाचे सदैव कौतुक करणारी माझी पत्नी अनुपमा, मुलगी समीक्षा व मुलगा सार्थक यांच्यासह सर्व कुटुंबिय व मित्रपरिवार यांचेही आभार. तसेच शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूरच्या श्रीमती सुमती लांडे, चित्रकार, अक्षरजुळणीकार या सर्वांचे मनापासून आभार.

— डॉ. सतीश कामत

## ऋणनिर्देश

डॉ. धनाजी गुरव
डॉ. नीलकंठ शेरे
डॉ. नानासाहेब यादव
डॉ. राजेंद्र डोंगरदिवे
डॉ. गोकुळ शिखरे
डॉ. गिरीश मोरे
डॉ. राजाराम राठोड
डॉ. अनील बांगर
डॉ. सुभाष पाटील
डॉ. विकास पाटील

डॉ. अनील सकपाळ
डॉ. सूर्यकांत आजगावकर
डॉ. विनोद कुमरे
डॉ. भटू वाघ
प्रा. जगदीश राणे
डॉ. गोमटेश्वर पाटील
डॉ. प्राजक्ता शिंत्रे
डॉ. निवृत्ती कार्वेकर
डॉ. बाळासो सुतार
प्रा. राजरत्न दवणे

## अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| ● | प्रस्तावना | ७ |
| १. | नाटक : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल<br>प्रा. राजरत्न दवणे | १३ |
| २. | 'सत्यशोधक'<br>जोतीराव फुले यांचे चरित्रनाट्य<br>डॉ. गिरीश मोरे | ३७ |
| ३. | 'सिगारेट्स'<br>आधुनिक तरुण पिढीच्या मूल्यव्यवस्थेचा नेमका शोध<br>डॉ. निवृत्ती कार्वेकर | ५१ |
| ४. | प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार<br>डॉ. अनिल बांगर | ६३ |
| ५. | 'कुंपनापलिकडचा देश'<br>स्वास्थ्य व स्थैर्य हरवलेला 'पाकिस्तान'<br>डॉ. सुभाष पाटील | ७६ |
| ६. | श्रीलंकेतील प्रवासाचा आस्वादनामा<br>'नाद अंतरीचा श्रीलंका'<br>डॉ. बाळासो सुतार | १०० |
| ७. | कथाः संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल<br>डॉ. गोमटेश्वर पाटील | १२५ |
| ८. | वैविध्यपूर्ण आणि आशयसंपन्न 'कथाबंध'<br>डॉ. विकास पाटील | १४९ |
| ९. | कविता : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा<br>डॉ. प्राजक्ता शिंत्रे | १६९ |
| १०. | 'काव्यबंध'<br>वर्तमानाच्या अंतर्बाह्य स्वरूपावर प्रकाशझोत<br>डॉ. राजाराम राठोड | १९० |
| ११. | 'काव्यबंध' मधील दलित जाणिवेचे कवी व त्यांची कविता<br>डॉ. सतीश कामत | २१८ |
| ● | लेखकांचा परिचय | २३४ |


Scanned with OKEN Scanner

आशा बगे, गौरी देशपांडे, प्रिया तेंडूलकर, मेघना पेठे या समकालीन स्त्री लेखिकांनीही ८० नंतरचे मराठी कथा विश्व समृद्ध केले आहे. आशा बगे यांचे मारवा पूजा हे कथासंग्रह, गौरी देशपांडे यांचे 'आहे हे असं आहे' हा कथासंग्रह, प्रिया तेंडूलकरांचे 'ज्याला त्याचा प्रश्न, जन्मलेल्या प्रत्येकाला, जावे त्यांच्या वंशा, सानियांचे शोध, प्रतीती, दिशा घरांच्या, खिडक्या, परिमाण हे कथासंग्रह स्त्रीवादी दृष्टिकोन कथेतून व्यक्त करतात. मानवी नातेसंबंध, स्त्री-पुरुष संबंध, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वासाठी स्त्रीची घडपड, त्यात असफल झालेल्या स्त्रिया या कथांमध्ये येतात. कमल देसाई, मेघना पेठे या लेखिकांनी स्त्रियांचे बेधडक प्रश्न मांडले आहेत. कमल देसाईंचा रंग व मेघना पेठे यांच्या हंस अकेला, आंधळ्याच्या गायी या संग्रहातून मानवी जीवनातील एकाकीपण, अर्थशून्यता, विकृती यांचे चित्रण होते.

१९७० ते ८० च्या दशकानंतर अनेक कथाकारांनी कथेत प्रयोग केले आहेत. दीर्घकथा, साखळी कथा, अस्तित्ववादी कथा, फॅन्टसी व कथेच्या निवेदनातील प्रयोग यामुळे मराठी कथेची वैविध्यपूर्ण मांडणी या काळात दिसते. या कथाकारांमध्ये एस. डी. इनामदार, राजेंद्र बनहट्टी, अनिल डांगे, विलास सारंग, श्याम मनोहर, रंगनाथ पठारे या लेखकांची कथा लक्षात घेत येईल. एस. डी. इनामदार, ए. वि. जोशी, अनिल डांगे, अरुण साधू हे समकालीन प्रयोगशील कथाकार असून अर्धनागर, अर्धग्रामीण जीवन आपल्या कथेत मांडतात.

नवकथेपूर्वीच्या व नवकथेच्या आसपास मराठी कथेतील व्यक्तिचित्रणात्मक कथा, मध्यमवर्गीय जाणिवा, ग्रामीण प्रादेशिकता अशा विषयाला बगल देवून नवकथेनंतरची कथा अविष्कृत होताना दिसते. अस्तित्ववादी जाणिवा, मानवी जीवनातील एकाकीपणा, मानवी जीवनातील भ्रमनिरास आणि कथालेखनामध्ये निवेदनाचे अनेक प्रयोग हे ७० च्या दशकानंतरच्या कथेचे विशेष प्रामुख्याने जाणवतात. समकालीन मराठी कथा आज आणखी पुढे जाऊन नव्या दिशा आणि वाटा धुंडाळताना दिसते आहे.

●●

**आधारभूत संदर्भग्रंथ**

१. मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
२. साहित्य : अध्यापन आणि प्रकार, संपा. श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मौज प्रकाशन, मुंबई



८.

# कथाबंध
## वैविध्यपूर्ण आणि आशयसंपन्न

**डॉ. विकास पाटील**

कथा सांगण्याची आणि ऐकण्याची खूपच प्राचीन परंपरा आपल्याकडे आहे. कथेचे आकर्षण सर्वांनाच आहे. मराठीत कथा हा वाङ्‌मय प्रकार म्हणून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाला असला तरी तो या अगोदर अस्तित्वात नव्हता असे नाही. कथेचा उगम हा मानवाच्या आदिस्थितीत झालेला आढळतो. आदिकाळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरुपात कथा अस्तित्वात होती. भारत ही तर लोककथांची खाण मानली जाते. भारत हा कथाप्रिय म्हणून नावाजलेला देश आहे. अगदी पुरातन काळापासून कथेकडे बघण्याची भारतीयांची दृष्टी भाविकाचीच आहे.

'कथाबंध' या कथासंग्रहात आशय विविधता, विषयविविधता व रचनेची विविधता दर्शविणाऱ्या कथा आहेत. 'बुध्दाची शपथ', 'भूक', 'चौथी भिंत', 'झूमर्च दांडी', 'विन्हार' या कथा दलित कथा आहेत. 'पाणबळी', 'लचांड', 'सातबाऱ्याच गर्भ', 'राखीव सावल्यांचा खेळ', या ग्रामीण कथा आहेत. 'उद्‌ध्वस्त', व 'मोरार बायको' या मनोविश्लेषणात्मक पातळीवरुन मांडणी केलेल्या कथा आहेत. 'नर्व गोष्ट शिकवण्यासाठीची गोष्ट', 'पूर' या महानगरीय कथा म्हणाव्या लागतील. मेलोच नाही' व 'भुताळ्या' या आदिवासी कथा आहेत.

'बुद्धाची शपथ' या कथेतील साहेबू, विलास, जगू, मोहन, विश्वास बालचमूनी घेतलेली बुद्धाची शपथ खरी करुन दाखवली आहे. विलास मास्तरला आईने पाटलाच्या ऊसात रेडकू शिरलं म्हणून मारलं. कोणाच चुकीसाठी कोणालातरी शिक्षा देणं हे विलासला बरं वाटलं नाही. बुद्ध झार आपण कोणालाही मारायचे नाही ही बुद्धाची शिकवण त्याच्या मनात र

रुजलेली दिसते. त्यामुळेच घरी न जाता रेल्वेने ही मंडळी वरळीला (मुंबई) जातात. आठ ते अकरा या वयोगटातील पाच मुलांनी चिंचणी ते वरळी (मुंबई) असा प्रवास खिशात एक रुपायाही नसताना कसा केला याचा वृत्तांत या कथेत आला आहे. या प्रवासात या बालचमूला आलेल्या अडचणी आणि त्यावर केलेली यशस्वी मात या कथेत दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करुन बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांच्या धर्मांतरासोबत शहरातील, खेड्या-पाड्यातील लोकांनीही धर्मांतर केले. धर्मांतर केलेल्या मोठ्या माणसांबरोबरच हे बुद्धाचे तत्त्वज्ञान लहान मुलांच्यातही झिरपत गेल्याचे या कथेतून दिसते. शपथ ही आपल्या मनातील इप्सित साध्य करण्यासाठी घातली जाते. ही मुले आपण घरी जायचे नाही म्हणून बुद्धाची शपथ घेतात. कितीही संकटे आली तरी ही मुले आपण घेतलेल्या शपथेपासून जराही विचलीत होत नाहीत.

मोठी माणसे आपल्या गरजेनुसार शपथेचा वापर करतात. आपल्या सोयीसाठी शपथ मोडतात पण ही बालमने शपथेपासून विचलीत न होता केलेला निर्धार कडेला घेऊन जातात. रेल्वेत अर्धी भाकरी देणारा जाडजूड म्हातारा हा माणूसकीचं दर्शन घडविणारा समाजाचा घटक आहे तर वरळीच्या दिशेला चला म्हणणारा मुंबईतला धिप्पाड म्हातारा हा शहरीकरणातल्या नागवू पहाणाऱ्या वृत्तीचे प्रतिनिधीत्व करणारा आहे. कुंकूम सिनेमापुढे शेंगा विकत बसलेली म्हातारी ही शहरीकरणातल्या माणूसकीचे दर्शन घडविणाऱ्या वर्गाचे प्रतिनिधीत्व करते. मुंबईत मुतायला जागा नाही, अन्न नाही ही मास्तरची तक्रार शहरांच्या वास्तव स्थितीचे दर्शन घडविते. या मुलांना वरळीच्या वस्तीत घेऊन जाणारी मुस्लीम म्हातारी, त्यांना जेवण घालून, त्यांच्या नातलगांच्या भेटीसाठी त्यांना बागेत घेऊन उभी राहणारी म्हातारी माणूसकीच्या भिंती धर्मापलिकडे जाऊन जपतांना दिसते.

अण्णाभाऊच्या कथेत अशी दलित वस्तीतील माणसे दुर्दम्य इच्छा शक्तीने जगतांना दिसतात. या दलितांच्या व्यथा, वेदना, त्यांच्यावर होणारा अत्याचार या साऱ्याचे चित्रण जसे त्यांच्या कथांमधून होते तसेच त्यांच्या कथेतील ही सामान्य माणसे असामान्य व व्यापक समाजहिताचे कार्य करतांना दिसतात. या कथेतील मूले आपल्या निर्णयापासून तसूभरही ढळत नाहीत. अण्णाभाऊनी उभी केलेली माणसे अशी तत्त्वनिष्ठ दिसतात. या कथेतून व्यक्त झालेली बालमनातील बुध्दविचारांवरील अढळ श्रध्दा मोठ्या माणसांनीही आत्मसात करण्याची गरज आहे.

मराठी साहित्यातील आघाडीचे लेखक म्हणून बाबुराव बागूल ओळखले जातात. त्यांचे 'जेव्हा मी जात चोरली होती' व 'मरण स्वस्त होत आहे' हे कथासंग्रह



खूपच गाजले. त्यांच्या 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहातील 'भूक' ही त्यांची कथा वाचकांनाही अस्वस्थ करुन सोडते. भूक ही माणसाला लाचार बनविते. भूकेने व्याकूळ झालेल्या माणसांकडून अनावधानाने विपरीत घडते. त्यातून जीवन कसे उद्ध्वस्त होते याचे दर्शन ही कथा घडविते.

रोजच्या मोलमजूरीशिवाय यांच्या घरी चूल पेटत नाही अशांपैकी एक म्हणजे भागू कोळीण होय. तिच्या घरात अठराविश्व दारिद्र्य सदैव निवास करून आहे. पावसाचा मारा मोठ्या प्रमाणात असल्यानं काही कामधंदा तिला मिळत नाही. त्यातच थंडीतापाने आजारी पडली आहे. तिला या आजारपणातही आपल्यापेक्षा भिका आणि सटवा या आपल्या दोन मुलांची काळजी आहे.

ती भिकाला गावात पाटलीण बाईकडे पीठ आणायला पाठवते. पाटलीणबाई नेहमी पाणउतारा करते म्हणून भिकाला तिच्याकडे जाणे आवडत नाही. भूकेच्या व्याकूळतेला मान अपमान नसतो हे आईने सांगितल्यानेच त्याला नाईलाजाने तिकडे जावे लागते. सखूकडे जाण्याचा आग्रह धरणाऱ्या सटवालाही भागू ती आपल्यापेक्षा हलक्या जातीची आहे हे सांगू इच्छिते. पण सटवाची तेवढी समज नाही आणि भागूवर सखूचे उपकारही खूप आहेत. पाटलीणबाईकडे जाऊन भाकरीचे शिळे तुकडे व कालवण घेऊन आलेला भिका खूपच अपमानीत होऊन आलेला असतो. तर सखूकडून नागलीची भाकरी घेऊन आलेला सटवा खूपच आनंदी असतो.

मुलांच प्रेम आणि त्यांची भूक पाहून व्याकूळ झालेली भागू आपलं आजारपण विसरते. मासे पकडून अहीर माशाचं कालवण करून आपल्या मुलांना ते पोटभर खावू घालण्यासाठी ती जाळे घेऊन नदीकिनारी जाते. पूर ओसरल्याने नदी किनारी गाळाचे, घाणीचे साम्राज्य असते. अंगात त्राण नसतांना व सारे अंग ठणकत असतानाही ती अहीर माशाचा शोध घेत रहाते. मिळालेले मासे ती भिकाकडे विक्रीला पाठविते. मासे घेऊन जात असतांना पुरात सापडलेला, गलितगात्र झालेला एक काळा साप कमी लांबीचा व जास्त जाडीचा साप आईला चावेल म्हणून भिका दगडाने मारण्याचा प्रयत्न करतो पण तो साप हळूच बाहेर पडतो व प्रवाहाबरोबर दिसेनासा होतो.

शरीरातील सारं बळ एकवटून अहीर माशाच्या शोधासाठी भागू प्रयत्न करते. शेवटी तिच्या जाळ्यात अहीर सापडतो. तो घेऊन येते. घरी पावसाच्या पाण्याने ठिबकणारी झोपडी व झोपडीभर पसरलेल्या गडद अंधारात ती तो मासा कापते त्याचे लहान लहान तुकडे स्वच्छ करुन मातीच्या तवलीत शिजत टाकते. भिका तांदूळ घेऊन आल्यावर भात करते. मुलांना जेवू घालून सर्वजण झोपी जातात. रात्री झोपेत उठलेला भिका तिला पळवून लावलेल्या सापाविषयी सांगतो आन् ती



Scanned with OKEN Scanner

थरथर कापू लागते. मांजरीने खावू नये म्हणून तीने चुलीवर वाफवून ठेवलेले माशांचे तुकडे अंधारात हाताने चाचपून पहाते. ते सारे तीला सापाचे वाटतात. त्या माशाचे डोकं चाचपून पहाते तर तेही सापाचे असते. आपल्या मुलांना आपण साप खावू घातला याची प्रचंड भीती तिला वाटते. आपली मुले आता मरणार या भीतीने तिचे काळीज फाटते ''सटवा...भि...का!''(पृ. ४३) म्हणून ती खाली कोसळते व गतप्राण होते.

आपल्या मुलांची भूक पाहून व्याकूळ झालेली आई अहीर माशाचे कालवण करून आपल्या मुलांना भरपेट जेवू घालून समाधानाचा ढेकर देऊ इच्छिते. अंगात बळ नसतानाही ती मासे पकडते पण दुर्देवाने तिने अहीर म्हणून पकडलेला मासा साप असतो. अंधारात तिला त्याची जाणिव न झाल्याने तिच्याकडून हे कृत्य घडते. येथे अंधाराचा प्रतिकात्मक वापर लेखकाने खुबीने केला आहे. झोपडीत असणारा अंधार भागूच्या दारिद्र्याचा आणि तिच्या जीवनात पसलेल्या दुःखाचा अंधार आहे. अंधारातच ती साप मासा म्हणून कापते व मुलांना खावू घालते. त्या धक्क्यामुळे ती अंधारातच गतप्राण होते तर बाहेर चंद्रही ढगाच्या आड गेलेला असल्याने अंधार पसरला होतो. हा अंधार आता भिका व सटवा यांच्याही जीवनात पसरला होता. कारण त्याचा जगण्याचा आधार आता नाहीसा झाला होता.

बागूलांची ही कथा वाचकांच्याही मनाचा ठाव घेते. दारिद्र्यातही जातीयतेचे विष मनामनात किती घट्ट रुजले आहे हे भागूच्या सखूविषयक बोलण्यातून दिसते. घरात कितीही दारिद्र्य असलं तरी आईच्या मायेच्या समूद्राला मात्र कधीही आहोटी येत नाही. हे भागूचे तिच्या मुलांवर असणारे प्रेम पाहून दिसते. पण पोटाची खळगी ही मनातील मायेनं वा डोळ्यातील आसवांनी भरता येत नाहीत तर त्यासाठी अन्नच लागतं हे वास्तवही डोळ्याआड करता येत नाही. भिकाच्या होणाऱ्या अपमानातून माणूस भूकेमुळे कसा व्याकूळ होतो, लाचार होतो हे समजते. आपल्याच हातून आपल्या मुलांना काहीतरी अपाय झालाय या समजामुळं जागीच गतप्राण होणारी माऊली म्हणजे आजच्या युगातीलच नव्हे तर अनादी कालापासून चालत आलेल्या माऊलीच्या मायेचे उत्तम उदाहरण आहे. भूक कशी जिवावर बेतते याचे दर्शन ही कथा घडविते.

'चौथी भिंत' ही उर्मिला पवारांची कथा अनेक प्रश्नांना एकाचवेळी भिडतांना दिसते. जातीधर्माच्या भिंती मानवी मनात किती खोलवर रूजल्या आहेत यांचे दर्शन घडवितानाच पैसा नसला की नात्यातील माया कशी आटते व ग्रामीण-शहरी, सुशिक्षित-अशिक्षित या भेदानाही गाडून नात्यातील जिव्हाळा कसा जपला जातो या दोहोंचे दर्शन या कथेतून होते. पुढाऱ्यांचा ढोंगीपणा, समाजसेवी संस्थांच्या मुळाशी असलेले अर्थकारण यावरही ही कथा भाष्य करातांना दिसते.



पांडुरंग मेढेकर उर्फ नाना आपल्या पोस्टातील नोकरीतून मिळालेली पन्नास हजार रुपयांची मदत आपल्या निवृत्तीच्या सत्कार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक केंद्र उद्घाटन कार्यक्रमात या केंद्राला देतो. त्यामुळे नानांची घरातील किंमत संपते. कधीकाळी गावचे घर विकू नको म्हणणाऱ्या काकीला खडे बोल सुनवून आपली मुले आपल्याला अंतर देणार नाहीत म्हणणाऱ्या नानाला वास्तवाचे भान येते. मुलांशी वाद झाल्यावर नाना 'संध्याछाया' वृध्दाश्रमात जातात. प्रवेशावेळी गुरख्याला पाच रुपये दिल्यावर त्याच्यात झालेला बदल पाहून तेथील व्यवस्थेचा अंदाज त्यांना येतो.

नानांना दिलेल्या खोलीत याअगोदर जोशी, सावंत, रसाळ हे तिघे रहात होते. नानासह साऱ्यांनीच कुटूंबाने आपल्याला कसे बहिष्कृत केले आहे याची चर्चा केली. आता चौघेही कुटूंब बहिष्कृत होते. त्यांच्या वाट्याला एकाकीपण आले होते. त्यांच्या दुःखाची जात एकच होती ती म्हणजे बहिष्कृतता पण दुर्देवाने सगळ्याच्याच मनात असा विचार येत नाही. वृद्धाश्रमातील जोशी, सावंत, रसाळ यांनी देवपूजा करण्यासाठी एक एक भींती धरलेल्या असतात ते नानांना चौथी भिंत देतात. पण नाना बौद्ध असल्याने त्यांना धर्मांतर आठवते. ते त्या भिंतीवर कोणताही देवाचा फोटो लावत नाहीत. यामुळे पूर्वीच्या तिघांच्या मनात नानाविषयी तिरस्कार वाढीस लागतो, घरातील तिरस्काराला कंटाळून ते येथे आलेले असतात. पण येथेही त्यांच्या वाट्याला तिच तिरस्काराची दृष्टी येते. त्यामुळे ते अस्वस्थ असतात.

त्याचवेळी त्यांना शोधत त्यांची गावची अशिक्षित, अडाणी काकी येते. ती नानाला गावाकडे चल म्हणून विनवते. तिथे कोणतेही पैसे न देता फक्त नविन सुरू होणाऱ्या बालवाडीतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कर म्हणून विनविते. या बालवाडीच्या उद्घाटनाचं पत्रक त्याच्या हाती देते. त्यावर एका बाजुला महात्मा फुले, एका बाजुला डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर मध्यभागी भगवान गौतम बुद्ध अशा तिघांच्या प्रतिमा छापलेल्या असतात.

या मुलांसाठी आयुष्यभर कष्ट उपसले त्या मुलांनी उतारवयात अंतर दिले व या चुलतीला कधी रुपायाचीही मदत केली नाही, ती मात्र आज आपण कफल्लक असतांना आभाळाचं मन घेऊन भेटायला आली. नानांनी काकीची क्षमा मागीतली व आपल्या सहकाऱ्यांचे आभार मानले. त्यांनी नानांच्या स्वत्वाची ओळख करुन दिली. आजही नानांच्यात असणाऱ्या कार्यक्षमतेची जाणीव करुन दिली. जाताना शेवटी नानांना देवपूजेसाठी दिलेल्या चौथ्या भिंतीवर बालवाडीच्या उद्घाटनाची पत्रिका चिकटवून वृद्धाश्रमातही जातीयतेच्या भिंती अजुनही अस्तित्वात आहेत तेथेही भगवान बुध्द, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या विचारांची निकड असल्याचेच दाखवून दिले. ही चौथी भिंत नविन विज्ञानवा

विचारांची, समतेची, मानवतेची हवी हाच विचार येथे प्रकट झाल्याचे दिसते. समाजसेवा फक्त पैसे देऊनच करता येते असे नाही तर आपला अनमोल वेळ देऊन, आपल्याकडील ज्ञान देऊनही समाजसेवा करता येते हा नवा विचारही येथे रुजविल्याचे दिसते. शिक्षणाने आलेली व्यवहार्यता व त्यामुळे मुलांचे वडिलांकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष्य या कथेत दिसते. "मी आजपासून ठरवलंय की आपल्या शरिराचा उपयोग मरेपर्यंत दुसऱ्यासाठी करायचा. बस्स." (पृ.६१) हे नानांचे उद्‌गार अखेरच्या क्षणापर्यंत समाजसेवा करुन दुसऱ्यासाठी जगत रहा त्यात आनंद आहे हे सुचवितात.

'झूमची दांडी' ही डॉ. कुमार अनिलांची पारंपरिक कथासंकेतांना मोडीत काढून नव्या अभिव्यक्तीने साकारलेली कथा आहे. ही चित्रपट धाटणीची कथा चित्रपटाची भाषा वापरुन लिहिली आहे. या कथेचे शीर्षकही खूपच समर्पक आहे. या कथेचे स्वरूप जीवन स्पंदनाचे चित्रण असे आहे.

एका डॉक्यूमेंट्री फिल्मच्या शुटींगच्या वेळी घडणारी घटना घडत असतांना दलितांना दास्याची जाणीव करून देण्याचा सफल प्रयत्न कथेतून प्रगटतो. कोल्हापुरात शुटींग सुरू आहे. फिल्मी दुनिया ही झगमगाटाची आहे. या झगमगाटी दुनियेत दलितांना फक्त जुजबी कामासाठीच वापरले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेला ही व्यवस्था फारसे महत्त्व देतांना दिसत नाही हेच वास्तव डॉ. कुमार अनिलांनी वाचकांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

या फिल्मच्या शुटींगसाठी शांताबाई मॉब पुरविते. ती ही माणसे भीमनगरातून आणून पोहचवते. या माणसांना आणलं जातं. त्यांना बराचवेळ थांबवलं जातं. पुन्हा मॅटेडोअरमध्ये घालून दाटीने भीमनगरात पोहचवलं जातं. या मंडळींना दुसऱ्या दिवसासाठी कामाचा निरोप सकाळी मिळेल असं सांगितलं जातं यावरूनच त्यांना फारसं महत्त्व ही व्यवस्था देतांना दिसत नाही.

यातील आबा व गणपत कांबळे यांच्यावर शूट होणाऱ्या दृष्यातूनही सध्याच्या व्यवस्थेवर भाष्य केलेले दिसते. आबा पाटील दलितांविषयी कठोर बोलत असतांना गणपा कांबळे मात्र पेंगतो आहे यावरूनच या व्यवस्थेशी ही दलित मंडळी कशी सरावली आहेत हे स्पष्ट होते. आपल्याला हिनवले जाते पण आपल्याला आत्मभान आलेले नाही. व्यवस्थेचा आपण एक घटक बनलो आहोत हे सत्य गणपा कांबळेने स्वीकारले आहे.

ही सारी माणसे फक्त जगण्यासाठीच धडपडत आहेत. मानसन्मान यापेक्षा दिवस कंठण्यात धन्यता मानत आहेत. हीच वेदना या कथेतून व्यक्त होते. शुटींगमध्ये चेहरा हरवलेला दलितांचा चेहरा, देवीचा वणवाला चेहरा, पेंगणारा गणपत कांबळेचा चेहरा, फिल्मसाठी मॉब पुरविणारी शांताबाई, परावर आबांनी दलितांची केलेली



अवहेलना, दलित वस्ती म्हणून उभा केलेला झोपड्यांचा सेट हे आजच्या युगा. कितीही आधुनिकता आली तरी दलितांबद्दलच्या समजुती बदललेल्या नाहीत याचेच प्रत्यंतर या कथेतून घडते.

"जाणीवसमृध्द कलानिर्मिती व्हायला हवी" (पृ.७१) यावर दिलेले "पोटार्थी जगात कसं शक्य आहे?" (पृ.७१) हे उत्तर खूपच बोलकं आहे. "सगळीच माध्यमं पैशांशी रिलेटेड."(पृ.७१) या वाक्यातून कलेच्या माध्यमांवर पैसा नसल्यामुळे दलित वर्चस्व मिळवू शकत नाहीत हे वास्तव अधोरेखित केले आहे.

"खूप लाचार जगतात आपली माणसं" (पृ.७१) या असिस्टंटच्या उद्‌गारातून जगण्यासाठी करावी लागणारी लाचारी समजते. तर "कधी समाजात फिरतोस का? मी मी म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दुकानात बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो नसतो दगडूशेठच्या गणपतीचा नाही तर साईबाबाचा फोटो असतो." (पृ.७२) हे असिस्टंटचे उद्‌गार म्हणजे दलितांना देव अजून नाकारलेला नाही याचे सूचन आहे. त्याचबरोबर व्यवसायाची गरज म्हणून बौद्धिक विचारांशी केलेली ती तडजोडही आहे.

प्रज्ञा पवारही मराठीतील आघाडीच्या लेखिका आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुध्दांच्या तत्वज्ञानातून समता, स्वातंत्र्य, न्याय या तत्त्वत्रयीचा पुरस्कार केला. अनेक दलित-दलितेत्तर कथाकारांनी कथेतून ही तत्त्वे अभिव्यक्त केलीत. त्यामधीलच एक महत्त्वाच्या लेखिका म्हणजे प्रज्ञा पवार होत. या कथासंग्रहातील त्यांची 'वि-हार' ही कथा दलित चळवळीच्या स्वरूपाची मांडणी करतांना त्यांच्यातील वैचारिक व सामाजिक संघर्षही स्पष्ट करते.

दादासाहेब साळवेंचा वारसा चालवण्याचे काम सुजाता व करुणा या दोघी बहिणी करत होत्या. दादांना दलित चळवळीत मानाचे स्थान होते. दादांच्या अचानक जाण्याने घरची सारी जबाबदारी सुजाताने घेतली होती. तर करुणाने डॉ. वाघसरांच्या सिध्दार्थ युवक संघटनेत स्वतःला झोकून दिलेले असते. सुजाता ही समन्वयवादी तर करुणा ही भलती आक्रमक असा दोघींचा स्वभाव आहे. करूणाला सुजाताविषयी असुया वाटते हे तिच्या स्वभावातून दिसून येतेच. वडिलांचे हार्ट अॅटॅकने झालेले निधन व घरात आजारी आई, त्यातच सुजाताची सुरु असलेली पीएच.डी. यामुळे पुरेसा वेळ सुजाताला चळवळीला देता येईना. हिच वेळ साधून करुणाने डॉ. वाघसरांच्या संघटनेत स्वतःला झोकून दिले. दादांच्या कार्याची वारसदार, त्यांच्या घराविषयी असणारी आस्था म्हणून डॉ. वाघानीही करुणाला अधिक अधिक संधी दिली. करुणाच्या आक्रमक स्वभावामुळे तिची आक्रमक भाषणे उपस्थितांना भावू लागली. तिचा हजरजबाबीपणा, वक्तृत्वातील आक्रमकपणा, हिंदूदेवदेवतांचा तिच्या व्याख्यानातून घेतला जाणारा समाचार यामुळे तिच्या सभा गर्दी खेचू लागल्या.



Scanned with OKEN Scanner

बाबासाहेबांमुळेच इथवर आले. बाबांचे विचार विकू? आपल्याच मायबहिणींसमोर! (पृ.क्र.७७) हे तिचं वाक्य श्रोत्यांना आपलसं करु लागलं. एक पै मानधन न घेता करुणा येते ही तिची कृती सर्वांनाच आवडू लागली. करुणाच्या आक्रमक स्वभावाने तिची लोकप्रियता वाढली होती पण या लोकप्रियतेपेक्षा समन्वयवादी भूमिकेने काम केल्यास ते अधिक परिणामकारक होईल अशी सुजाताची विचारधारा आहे. करुणाचं संघटनेतील महत्त्व आपसूकच वाढत जातं. त्यामुळे या संघटनेत स्थापनेपासून डॉ. वाघसरांच्या बरोबरीने काम करणारे चंद्रमणी, विकास, सुबोध, प्रतिमा हे काहीसे नाराजच असतात. त्यातच मसुरीतल्या बौध्द धम्म परिषदेस गेलेली करुणा सागरच्या बौध्द धम्मांच्या मांडणीवर इतकी फिदा होते की ते दोघेही प्रेमात पडतात. लग्न करण्याचा निर्णय घेतात.

सागर हा अंतर्बाह्य बौध्द असला तरी तो ब्राह्मण असल्याने संघटनेच्या विचारांशी प्रतारणा केल्यासारखे होईल म्हणून करुणाच्या या विवाहाला डॉ. वाघांसह संघटनेचाच विरोध असतो. उलट लक्ष्मण मानेंच्या मांडणीनुसार बौध्द युवतींनी विशेषत: संघटनेतील मुलींनी आवर्जुन, नव्याने बौध्द झालेल्या भटक्या विमुक्त मुलांशीच लग्नं करावीत अशी डॉ. वाघांची ठाम भूमिका होती. या त्यांच्या भूमिकेला करुणाच्या विचारांनी तडा जाणार होता. त्यामुळे सागरला बौध्द धर्म स्वीकारायला लावायचा हा संघटनामान्य तोडगा निघतो. तो सागरच्या गळी उतरविण्यासाठी बैठक बसते.

या बैठकीत हा विचार सागरसह सुजातालाही आवडत नाही. सागरची कुचंबना होते कारण करुणाला हा विचार पटलेला असतो. सुजाता हे सारे ओळखते व ती डॉ. वाघानाच सोयीसाठी धर्मांतर करण्याइतका बौद्ध धर्म संकुचित नाही असे सुनावते. त्याचवेळी प्रतिमा "खऱ्या अर्थानं बौद्ध असण्यासाठी बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याची गरज नसते. प्रत्येक व्यक्ती स्वयंप्रज्ञेनं बौद्ध होऊ शकते"(पृ.९३) या वाघसरांच्याच विधानाचा दाखला देते. त्यावेळी वाघसर निरूत्तर होऊन संघटनेच्या महाराष्ट्र दौऱ्याची धुरा करुणाच्या खांद्यावरून प्रतिमाकडे सोपवितात. वाघांच्या या निर्णयाने करुणा मात्र आवाक होते.

भारत बौध्दमय करण्याचे स्वप्न पाहणारे व खाजगी आयुष्य आपल्या मनाप्रमाणे जगू पाहणारे सामान्य लोक यांच्या भावनिकतेचा व मानसिकतेचा वेध घेणारी ही कथा आहे. आंतरजातीय विवाह ही संकल्पना सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया आहे, पण ती मानसिक पातळीवर घडली तरच सामाजिक परिवर्तन शक्य आहे. याचा प्रत्यय देणारी ही महत्त्वपूर्ण कथा आहे. या सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेचा सोप्या पध्दतीने अर्थ लावून तो आक्रमक असणाऱ्या संघटनेतील कार्यकर्त्यांच्या गळी उतरवणे आवश्यक आहे. येथे डॉ. वाघसर कमी पडतांना दिसतात. संघटनेत



काम करतांना चळवळ व खाजगी आयुष्य यामध्ये बऱ्याचवेळा तणाव निर्माण होतो पण संमजसपणे तो हाताळणारे कार्यकर्ते व नेते यांची वाणवा या कथेतून दिसते.

इथवर पाहिलेल्या सर्व कथा या दलित कथा आहेत. यापुढील काही कथा या ग्रामीण कथा आहेत. या कथा ग्रामस्तरावरील विविध समस्यांच्या मुळाशी जातात. ग्रामस्तरावरील प्रश्नांची मांडणी करतात.

भास्कर चंदनशिव यांची 'पाणबळी' ही कथा शेती आणि शेतकरी यांची समस्या मांडतानाच दुष्काळ काळ बनून कसा येता, शेतकऱ्यांच्या घरी जन्मणाऱ्या नव्या बाळालाही तो कसा गिळंकृत करतो याचे दर्शन घडविते.

गुलब्या आणि रखमा ही या कथेची नायक आणि नायिका आहेत. दुष्काळ गेली तीन वर्षे गावात निवास करून आहे. गुलब्या दमेकरी आहे. काही काम त्याला जमत नाही पण रात्री औषध म्हणून थोडी दारु तो पितो आणि रखमाला मारहाणही करतो. रखमा बिचारी एकटी कष्ट करते. तिच्यामुळेच घर चालते पण घरात दोन कळती पोर, एक रांगत व एक तिच्या पोटात वाढत आहे. अशी ही मुलांची लटांबळ आहे. भरीसभर म्हणून गुलब्याची आईही तिच्यावर भार आहे. दुष्काळानं पिडा केलेली होती. हाताला काम भेटत नव्हते आणि रखमाच्या गळ्यात ही लटांबळ होती.

धरणांवर काम भेटलं म्हणून परिसरातल्या खेड्यातून माणसं धरणा शेजारीच खोपटं मारुन रहात होती. गुलब्याही तिथच राहायला होता. पाण्याचं दुर्भिक्ष खूपच होतं. तिथल्या गाववाल्यांनी लोकांना पाणी देणं बंद केलं होतं. तीन वर्षाचा दुष्काळ असल्याने धरण सुरु असणाऱ्या खंडुबाच्या माळाशेजारी जवळपास कुंठही पाणी नव्हतं. त्यामुळे पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत होती. त्यातच रखमाचं पोट पाहून धरणावरील सायबानं रखमाला काम देणं नाकारलं होतं. खायला धान्य मिळत होतं, हाताला काम भेटत होतं पण पाणी प्रश्न गंभीर बनला होता.

रात्र वाढत होती आणि रखमाच्या पोटात कळा येत होत्या. गुलब्या दारु पिऊन बाजूला मृतवत पडला होता तर अंधारानं सारं माळरान आपल्या कवेत घेतलं होतं. अशा अंधारात ना कोणी सोबत ना कोणी डॉक्टर अशा अवस्थेत रखमा बाळंत होते. म्हातारीनं मुलाच्या आवाजावरून ओळखलं आणि जीव तोडून तीनं गुलब्याला हाक मारली. त्या हाकेसरशी गुलब्या उठला बंडाआत्या, गंगावयनी, यमाकाकी या साऱ्यांना हाका मारून आला.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या रखमाला बंडाआत्यानं सावध केलं. बाळाला अंघोळ घालण्यासाठी, त्याच्या अंगावर असणारा चिकट पदार्थ काढण्यासाठी पाणी जमा करु लागले. कुणाकडेही पाणी मिळाले नाही. त्यामुळे जन्मलेला एक



Scanned with OKEN Scanner

जीव अंगावरल्या घाणीने गुदमरुन मेला.

ग्रामीण भागातील समस्यांचा ही कथा जणू आलेखच मांडते. शेतकऱ्याच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ, दुष्काळामुळे परागंदा होणारी माणसे, प्राण्यांचे होणारे हाल, आरोग्याच्या अपुऱ्या सोयी, कुटुंबनियोजनाविषयी असणारे अज्ञान अशा कितीतरी समस्यांना ही कथा भिडताना दिसते.

शेतात काम करताना अंधारात किरडू डसलं आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. सोयरानं न खचता चार घरची धुणी भांडी करून रोहितला जीवापाड जपले आहे. रोहितही चांगला अभ्यास करून चौथीच्या परीक्षेत तालुक्यात पहिला आला होता. त्यामुळे त्याला इंग्रजी शाळेत प्रवेश सहज मिळाला होता. त्यामुळे सोयरानेही एक दिवसाची सुट्टी घेऊन रोहितला इंग्रजी शाळेत पहिल्या दिवशी सोडण्याचे काम केले. आई शाळेत सोडण्यासाठी आली म्हणून रोहित आनंदी होता. दुसऱ्या दिवशी काम करण्यासाठी ती जमनाबेनच्या घरी गेली आणि तेथील वातावरण बघून ती निराश झाली. जमनाबेन आणि शेटजींचा मुलगा हरीश याला इंग्रजी शाळेत प्रवेश मिळाला नव्हता. सातत्याने शेटजींनी शाळेत प्रवेशासाठी प्राचार्यांना आणि तेथील हेड क्लार्क यांना विनंती करूनही हरीश बाबूचा प्रवेश होत नव्हता. शेटजींनी डोनेशनचे अमिष दाखवूनही त्यांच्या हाताशी काही लागत नव्हते. जमनाबेनकडून शेटजींना रोहितला इंग्रजी शाळेत प्रवेश मिळाला आहे हे समजले. एखादा विद्यार्थी शाळा सोडून गेल्यास किंवा एखाद्या पालकाची बदली झाल्यास किंवा कोणी आजारी असल्यास त्याची सततची अनुपस्थिती गृहीत धरून त्याला डिपार्टमेंटच्या परवानगीने कमी करून दुसऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश देता येतो हे प्राचार्यांनी सांगितलेले सोल्युशन शेठजीनी वापरले आणि मिठाईतून रोहितला त्यांनी विषबाधा घडवून आणली. रोहित आजारी पडला आणि रोहितला इंग्रजी शाळेतला प्रवेश नाकारला गेला. आता जमनाबेनच्या घरची नोकरी सोयराने सोडली आहे. मात्र रोहित आणि सोयरा रोहितच्या प्रवेशासाठी शाळांमध्ये येरझारा मारत आहे.

या कथेमधून पैशाच्या जोरावर गोरगरिबांना त्यांच्या हक्कापासून कसे वंचित ठेवले जाते याचे वास्तवदर्शी चित्रण आले आहे. सोयरा गरीब आहे खालच्या जातीतील आहे पण तिचा मुलगा रोहित हुशार आहे. त्याने एकही पैसा डोनेशन न देता इंग्रजी शाळेत ॲडमिशन मिळवले. शेटजी आणि जमनाबेन यांना खटकते. जमनाबेनने दिलेली विषारी मिठाई सोयरा मुलाला खाऊ घालते. शेटजी आपल्या मुलाच्या प्रवेशासाठी रोहितचा बळी देतो. रोहितमध्ये गुणवत्ता असूनही पैशाच्या जोरावर त्याला कमी करून त्याजागी हरिषबाबूला प्रवेश दिला जातो. अडाणी आणि अगतिक सोयरा समाजातल्या या धनवान लोकांकडून कशी लुबाडली जाते याचे चित्रण ही कथा करते.

ग्रामीण कथाकार म्हणून बबन पोतदार यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. गुंजेचा पाला, आक्रित, एका सत्याचा प्रवास हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित



आहेत. कौटुंबिक श्रुतिका लेखनाचे कामही त्यांनी नियमित केले आहे. सूक्ष्म निरीक्षण आणि वस्तुनिष्ठ मांडणी ही त्यांच्या लेखणीची बलस्थाने आहेत. **'पकूमावशी'** ही या कथासंग्रहातील त्यांची कथा व्यक्तिचित्रणाकडे घेऊन जाणारी आहे. बालपणापासूनच लेखक अनुभवत आणि पाहत आलेल्या पकूमावशीचे रेखाटन लेखकाने या कथेतून केले आहे. आपल्या जीवनातील डोंगराएवढे दुःख बाजूला सारून पकूमावशी समाजातील सुखदुःखाशी एकरूप झाली आहे. लेखकाशी असणारे तिचे जिव्हाळ्याचे संबंध लेखकाने या कथेतून उलगडून दाखवले आहेत.

पकूमावशीचा बालविवाह झाला होता. प्लेगच्या साथीत लहानपणीच त्यांच्या नवऱ्याचा मृत्यू झाला. बालवैधव्य घेऊन पकूमावशी माहेरी आल्या आणि कायमच्याच माहेरी राहिल्या. लहानाच्या मोठ्याही माहेरी झाल्या. थोरला भाऊ आबा पाटलाच्या खटल्यात सामावून गेल्या. लेखकाच्या लहानपणापासूनच पकूमावशीचा जीव लेखकावर होता. गुरवाचा शिवा आणि लेखकाने एकदा शाळा बुडवल्यावर त्यांना घरातून बेदम मारहाण करण्यात आली. त्यावेळी दोघांनी शिवाच्या आतेकडे सांगवड्याला जायचे ठरवले. उन्हाच्या झळा जास्त असल्याने दोघेही पाणी पिण्यासाठी एका विहिरीत उतरले आणि त्यांना वरती चढता येईना. त्यावेळी आरडा ओरड केल्यावर पांडा कांडीवाला याने दोघांनाही बाहेर काढले आणि त्यांच्या घरी पोहोचवले. घरी आल्यावर लेखकाची आई पुन्हा मार देऊ लागली. त्यावेळी मात्र पकूमावशी पुढे होऊन तिने लेखकाचा मार वाचवला. आजही लेखक त्या आठवणीने हळवा झाला आणि त्याच्या डोळ्यात अश्रू जमा झाले. आजही पकूमावशीने पूर्वीप्रमाणेच लेखकाला हृदयाशी धरले. काय झालं माझ्या लेकराला? असं म्हणत त्याच्या केसातून तिची खडबडीत बोटे फिरवली. लेखकासाठी आणलेले सांडगे आणि भातवड्या तिने लेखकाच्या आईकडे दिल्या. तिच्या गळ्यातील बोरमाळ चोरट्याने गळ्याला हिसका मारून नेली हे दुःख तिच्या मनात सलते आहे. त्यावर ती लेखकाला म्हणते न्हानपनापास्नं जपून ठिवल्याली तेवडीच आटवन हुती बग. माज्या आजेसासूनं दिली हुती. मला कळतं तवापास्नं हुती माज्या गळ्यात! पृ.५६ सासरी कधीही न राहिलेल्या पकूमावशीच्या गळ्यात तेवढीच एक सासरची आठवण होती. तीही अशी हिरावून नेल्याने पकूमावशी दुःखी झाली होती. लेखक लहानपणापासून पहात असलेली पकूमावशी त्याला आजही दिसत होती. ती गेल्यानंतर तिची मायधूळ कपाळी लावत लेखक पुढील जन्म आपल्याला पकूमावशीच्या पोटी



Scanned with OKEN Scanner

मिळावा अशी आशा व्यक्त करतो. येथेच पकूमावशीच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी वाचकांच्याही लक्षात येते. निर्भेळ आणि निरपेक्ष प्रेम करणारी पकुमावशीसारखी माणसेच आजच्या समाजातील महत्त्वपूर्ण घटक आहेत. समाज स्वास्थ्य या प्रेमळ माणसांच्या जोरावरच टिकून आहे. स्वतःची मुले नसतानाही लेखकाला स्वतःचे मूल मानून त्याच्यावर मातेप्रमाणे प्रेम करणारी पकूमावशीसारखी माणसे विरळीच म्हणावी लागतील.

'उपरा' या आत्मकथनाने महाराष्ट्राबाहेरील आणि महाराष्ट्रातील घराघरात पोहोचलेले नाव म्हणजे लक्ष्मण माने होय. ते भटक्या विमुक्त समाजातील सामाजिक कार्यकर्ते आणि वास्तववादी लेखक म्हणून सुपरिचित आहेत. 'क्रांतिपथ' हा त्यांचा कवितासंग्रह 'खेळ साडेतीन टक्क्यांचा', 'पालावरचं जग', 'बंद दरवाजा' हे लेखसंग्रह, 'प्रकाशपुत्र' हे नाटक, या त्यांच्या साहित्यकृती प्रकाशित आहेत. त्यांनी केलेल्या या लेखन कामगिरीबद्दल त्यांना १९८१ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला होता. चळवळीत अग्रेसर राहून काम करणारे लेखक म्हणून त्यांची ख्याती आहे.

या कथासंग्रहात त्यांची **'मरणानंतरही जात आडवी'** ही कथा आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी दलित चळवळीने उग्ररूप धारण केले. आपल्या न्याय हक्कासाठी सर्वच समाजातील शोषित घटक, परंपरेने ज्यांचे हक्क नाकारले ते सर्व घटक दलित चळवळीत उभे राहिले, पण नंतरच्या कालखंडात या चळवळीला स्वकीयांचेच ग्रहण लागले. वंचितांचा, शोषितांचा व्यापक समूह पुन्हा जातीपातीत विभागला गेला. आपापल्या जातीचे नेतृत्व करावे या भूमिकेतून स्वार्थी आणि सत्तालोलूप नेते तयार झाले. आपल्या वैयक्तिक स्वार्थापोटी ही व्यापक दलित चळवळ विभागली जात आहे याची खूप मोठी खंत या कथेतून व्यक्त केली आहे.

कैकाडवाड्यात एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना काही महिलाही तेथे आल्या. त्या जय मातंग म्हणून खाली बसल्या आणि त्यातील एक स्त्री दलित चळवळ ही गतिमान झाली पाहिजे हे पोट तिडकीने सांगू लागली. त्यासाठी डॉ.बाबासाहेब गोपले यांच्या नेतृत्वाखाली आपण सारे एक झाले पाहिजे असे सांगताच मानेंना हा विचार खटकला. त्यांनी गोपले हे दलित चळवळ कशी विविध जातीत विभागत आहेत, हे सांगताच त्या महिला रागाने निघून गेल्या. मातंग समाज जय मातंग म्हणेल, चर्मकार म्हणतील जय ककट्या, आमचे भटके विमुक्त म्हणतील जय भटका, जय भवानी, जय शिवाजी असं जर



झालं तर पुन्हा आपण विभागले जाऊ. बाबासाहेबांनी दिलेला विचार मागे राहील असे मानेंनी सांगितले. त्यांचा हा विचार तेथील अनेक लोकांना पटला. त्यातील काही महिलांनाही पटला.

त्यानंतर ही सारी मंडळी कारोळी गावी आली. तिथे सातुबाईने आपल्या बापाच्या मृत्यूनंतर घडलेला प्रसंग सांगितला. त्यांच्या पिढ्यानपिढ्याच्या मसनवाटावर लिंगायत समाजाचा बिराजदार आपला हक्क सांगत होता. साताबाईच्या बापाचे प्रेत तिथे पुरू नये म्हणून त्याने पोलीस आणले होते. सातबाराच्या उताऱ्यावर ही जागा माझी हाय. मी माझ्या जागेत कुणाला पुरू देणार नाही अशी भूमिका त्याने घेतली. त्यामुळे बारा तास झाल्यानंतरही प्रेताला पुरण्यास जागा मिळत नव्हती. साताबाई पुढे सांगत होती आम्ही पोलीस आन बिराजदाराच्या हातापाया पडू लागलू, गावातल्या सरपंच, पाटील, पुढारी समद्यास्नी साकडं घातलं, पर उपेग झाला नाही. कुणालाच घाम फुटंना, मडं तर पडून राहिलं, रातीला म्हातारा मेला. बारा तास होऊन गेलं, मड्याला वास सुटाया लागला, मड्यावर घातल्याली फुलं वाळून गेली. माशा फिराला लागल्या. का करावं समजना, बिराजदार माणूस पैकावाला माणूस, काय करणार? पृ.६४ तिच्या या प्रश्नानं आजच्या समाजातली दलितांची स्थिती किती हलाखीची आहे हे समजते. शेवटी त्या गावातील मुलांनी विलास माने याला बोलावून आणले आणि त्याने बंडखोरी करत शेवटी खड्डा खणला. त्यात प्रेत पुरले. माने आणि लालसिंग रजपूत आल्यानंतर त्यांच्या मिरवणुकीने सभा या गावात संपन्न झाली. त्यातील काही भाषणे बंडखोरीपूर्ण झाली तर लालसिंग रजपूत यांचे भाषण संयमित आणि गावकऱ्यांची कान उघाडणी करणारे झाले. शेवटी जिवंत माणसाशी असणारे वैर आपण समजू शकतो पण माणूस मृत झाल्यावरही त्याला जात असते, तो गुन्हेगार असतो, भिकारी असतो, अस्पृश्य असतो हे भयानक वास्तव वाचकांनाही अस्वस्थ करून जाते.

मराठीतील एक यशस्वी लेखक आणि २०२२ मध्ये उदगीर येथे झालेल्या ९५ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून भारत सासणे यांची ओळख आहे. आपल्या लेखणीने नवकथेला वेगळा आयाम देण्याचे काम भारत सासणे यांनी केले आहे. त्यांचे अदृष्ट, अनर्थ रात्र, अस्वस्थ, कॅंप / बाबीचं दुःख, चिरदाह, त्वचा हे दीर्घकथा संग्रह प्रसिद्ध आहेत. आतंक हे दोन अंकी नाटक, राहींच्या स्वप्नांचा उलगडा ही कादंबरी असे बहुस्तरीय लेखन त्यांनी केले आहे. त्यांना २०२२ चा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे.



Scanned with OKEN Scanner

'कथारंग' या कथासंग्रहात 'अदृष्ट' ही त्यांची दीर्घकथा आली आहे. प्रियदर्शनी, सरडे व लंगोटे याबरोबरच स्वतः निवेदक ही या कथेतील पात्रे आहेत. मानवी जीवनात न केलेल्या कृत्याविषयी अनेक वंदता समाजात पसरवल्या जातात. हळव्या मनाची आणि भित्री माणसे या वंदताना सत्य मानून आपले निरपराधत्व सिद्ध करण्याच्या मागे लागतात. त्यातून ती अधिकच फसत जातात. न केलेल्या कृत्याविषयी आपल्या मनात अपराधी भावना बाळगतात. आपला खरेपणा समाजाच्या दृष्टीस आणण्यासाठी धडपडत राहतात. भारत सासणे यांची 'अदृष्ट' ही दीर्घकथा हाच आशय घेऊन प्रकटते.

प्रियदर्शनीशी निवेदकाचा विवाह होऊ शकला नाही. त्यानंतर तिच्याविषयी अनेक गैरसमज पसरवले गेले. ते सारे निवेदकानेच पसरवले आहेत असे आरोप निवेदकावर होत होते. प्रियदर्शनीचे डोळे गेल्यानंतर तिच्याशी विवाह करण्याचे निवेदकाने नाकारलेले असते. प्रियदर्शनी विषयीचा कोणताही विचार निवेदकाच्या मनात नंतर आला नाही. तरीही निवेदकाने प्रियदर्शनीचे जीवन उद्ध्वस्त करण्यासाठी अनेक प्रवाद पसरवले असे त्याच्यावर आरोप लावण्यात आले. त्यानंतर कळस म्हणजे प्रियदर्शनीच्या अंधसंस्थेची चौकशी लावावी म्हणून निवेदकाने पत्रव्यवहार केला असा आरोपही निवेदकावर लावला. त्याबरोबरच निवेदकाला घाबरवण्यासाठी अंध लंगोटे आणि सरडे यांना त्यांच्या पाठी लावण्यात आले. शेवटी या सगळ्या चौकशीच्या ससेमिऱ्यास घाबरून निवेदकाने प्रियदर्शनीची भेट घेतली. त्या भेटीतही निवेदकाने आपल्यावरील साऱ्या आरोपात तथ्य नसल्याचे प्रियदर्शनीस सांगितले. प्रियदर्शनीच्या बेधडक आणि साहसी स्वभावाने निवेदकाला अधिकच भीती वाटायला लागली. शेवटी निवेदक तेथूनही पळून आला. तिच्या वडिलांनी निवेदकास भेटीस बोलावले पण ती भेट प्रियदर्शनीशी अगोदरच झाली होती. मानवी जीवनातील आंतरिक क्लेश, मानवी जीवनातील अंतर्मनातील वैचारिक संघर्ष या कथेतून व्यक्त होतो. आंधळेपणा, काळा चष्मा, काळा कोट या प्रतिमांचा वापर प्रभावीपणे करत कथेला अपेक्षित उंची देण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

आदिवासी साहित्य प्रवाह गतिमान करणाऱ्या लेखिका आणि कवयित्री म्हणून उषा किरण आत्राम यांना ओळखले जाते. आदिवासींच्या व्यथा वेदनांची सक्षमपणे मांडणी करून त्यांनी आदिवासी बोलीतील गोडवा आणि रसरशीतपणाही वाचकांसमोर मांडला आहे. मोट्यारिन, म्होरकी, लेखणीच्या तलवारी हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. एक झोका आनंदाचा हा बालगीत संग्रह आणि



अहेर हा कथासंग्रह प्रकाशित आहे. २०११ साली झालेल्या नवव्या अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. या कथासंग्रहात त्यांची 'भूक' ही कथा आली असून, भुकेची दाहकता कशी जीवघेणी ठरते याचे वास्तव लेखिकेने मांडले आहे.

स्वातंत्र्यानंतर अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात आणि सारा समाज सुखी व्हावा यासाठी शासन प्रयत्न करते. पण हे प्रयत्न आदिवासी वाड्यापर्यंत, पाड्यापर्यंत आजही पोचले नाहीत. आजही तेथे अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता झालेली नाही. त्यामुळेच येथील आदिवासी बांधव अनेक नैसर्गिक संकटाशी सामना करत आहेत. निसर्गाशी एकरूप झालेला आदिवासी निसर्गाशी सामना करतानाच भूकबळी ठरतो आहे. याचे वास्तव चित्रण या कथेत आहे.

चंद्रपूर, गडचिरोली, भामरागड, रेंगापल्ली, कुव्हाकोडी इत्यादी परिसरात असणाऱ्या पर्लकोटा, पामलगौतमी, इंद्रावती, पैनगंगा, वैनगंगा या नद्या इतर ऋतूत नैसर्गिक ठेवा वाटतात, पण पावसाळ्यात मात्र यांच्या रुद्ररूपाला आदिवासी बांधवांना सामोरे जावे लागते. जंगलात भटकून उपजीविकेसाठी मिळेल ते खाऊन हे आदिवासी जीवन जगत असतात. पावसाळ्यात पावसाचा जोर वाढतो आणि पामली, पर्लकोटा या नद्या भरल्याने इंद्रावतीचे पाणी आदिवासी बांधवांच्या खोपटात शिरले. गावच्या मुखियाने सर्वांना आवाज देऊन पहाडीच्या दिशेने जाण्यास सांगितले. बिमार गजरी ती पण जर्जर झाली होती आणि लेकरू दुधासाठी रडून रडून शांत झालं होतं. हिरूची गर्भार बायको रातपासून अडली होती. तिचा रक्तप्रवाह पाण्यात दिसत होता. तर समरुची दोन दिवसाची जुळी मुलं आणि आजारी बायको मान टाकत पाण्यातून चालली होती. माणसांचा जगण्यासाठी चाललेला हा संघर्ष पाहून वाचकांचेही मन हेलावून जाते. पावसाचा जोर कमी होत नाही. पहाडीवर तेथील मोठ्या झाडांच्या पोकळ ढोलीत माणसे आश्रय शोधण्याचा प्रयत्न करतात. पण त्याचवेळी तिथले साप, पशुपक्षी आपली जागा सोडायला तयार नसतात. जशी जागा मिळेल तशी माणसे तिथे दिवस कंठण्याचा प्रयत्न करतात. सतत पडणाऱ्या पावसामुळे मोठ्या माणसांबरोबर लहान मुलांच्याही पोटात काहीच नसते. लहान मुले तर भुकेने व्याकुळ झालेली असतात. भुकेने व्याकुळ झालेली मुले ओरडत असतात म्हणून तिथे मिळेल ते अन्न शोधले जाते. गाभूळलेले लालसर कांदे काढले जातात पण त्यांना शिजवण्यासाठी, त्यातील विष काढण्यासाठी या आदिवासी बांधवांच्याकडे काहीच



Scanned with OKEN Scanner

नसते. कसाबसा पालापाचोळा पेटवण्याचा प्रयत्न होतो पण हे कंद व्यवस्थित भाजले जात नाहीत. त्यातले विषही निघून जात नाही. भुकेने व्याकुळ झालेल्या मुलांना मात्र आता कशाचीच भीती राहिलेली नसते. कडू कडू वाटणारे, ते विषारी कंद मुले खातात आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू होतो. लहान मोठ्यांना उलट्या, मळमळ, चक्कर येऊन एकच तारांबळ उडून भीतीचा गोळा पोटात उठू लागतो. खूप उलट्या करून, विष भिणलेली चित्रु तुंडे, रेनु, मैनी, डोलू पदा, लिखू ही सात ही लेकरं हातपाय घासू लागली. एकच आकांत झाला. हा आकांत वाचकांनाही अस्वस्थ करून सोडतो. उद्याचे भारताचे नागरिक होऊ घातलेली ही मुले अशी लहानपणीच भुकेने व्याकुळ होऊन मरतात. पोटात भूक घेऊन आमची लेकरं नेली रे उचलून! माझी रेनु, माझा डोलू, मावा चुंडे, मावा चित्रा! मावा रुपी! 'मावा जीवा' होच्या, मावा पेकोरं पिल्ला बेके होतूर? बेके होतूर? पृ.१११ असे म्हणत त्यांच्या बापाने केलेला आक्रोश वाचकांच्या डोळ्यातही अश्रू उभे करतो. हे खूपच दुःखदायक आहे. या मुलांच्या मृत्यूनंतर आदिवासी बांधवांनी केलेला आकांत आपणालाही अस्वस्थ करून जातो. भुकेची तीव्र वेदना मानवी जीवन कसे गिळंकृत करते याचे हृदय पिळवटून टाकणारे वास्तव अन्नाम यांच्या या कथेत आले आहे.

मराठीतील एक नामवंत लेखक म्हणून जयंत पवार यांना ओळखले जाते. मराठी नाटककार, नाट्य समीक्षा तसेच कथाकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाने त्यांना सर्वोत्कृष्ट लेखकाचे पारितोषिक मिळवून दिले होते. अधांतर, काय डेंजर वारा सुटलाय, टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन इत्यादी त्यांची नाटके प्रकाशित आहेत. दरवेशी ही त्यांची एकांकिका प्रकाशित आहे 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला २०१२ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला होता. 'वरनभात लोन्चा नी कोन नाय कोन्चा' हा कथासंग्रह त्यांचा प्रकाशित आहे. आपल्या लेखणीने त्यांनी मराठी साहित्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांची 'हॅरीचं हसू' ही कथा या कथा संग्रहात आली आहे. देशासमोरील मूलभूत प्रश्नांना भिडण्याऐवजी आपल्या बायकोच्या आग्रहाखातर गृहराज्यमंत्री आफ्रिकेतून हसणारा पाणघोडा आणतात. त्या पाणघोड्याची बातमी मिडियात मोठ्या प्रमाणात चालते. सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या प्रश्नांना सोडून या मंत्री महोदय यांच्या खेळाकडेच रमण्याची वृत्ती येथे मिडियाचीही दिसते. मंत्री महोदयांनी आणलेल्या पाणघोड्यावर त्याला हसवण्यासाठी पुन्हा मेहनत घेतली जाते. त्याचीही बातमी मिडियात होत राहते



म्हणजेच येथील मूलभूत प्रश्नांवर विचार न करता आपला मेडियातही कि... अनावश्यक गोष्टींवर चर्चा होते याचे दर्शन या कथेत घडते.

युगांडात झालेल्या तिसऱ्या जगातल्या शांततेविषयीच्या एका परिषदेला गृहराज्यमंत्री सपत्नीक गेले होते. परिषद आटोपल्यावर आफ्रिकन सफारीचा आनंद लुटण्यासाठी ते विरंगा पार्कच्या जंगलात गेले. तिथं त्यांच्या गाडीच्या समोर अचानक एक हॅरीसन नावाचा पाणघोडा आला. जो दिसायला देखणा होता आणि हसल्यासारखा त्याचा चेहरा होता. त्याच्या दर्शनाने मंत्रिमहोदयाच्या पत्नी मंत्रमुग्ध झाल्या. हा हॅरीसन भारतात आणण्याचा आग्रह त्यांनी पती महोदयांच्याकडे धरला. देशातली जनता अनेक संकटाशी सामना करत असताना मंत्री महोदयांना पत्नीचा आग्रह महत्त्वाचा वाटला. त्यांनी हा हसणारा पाणघोडा भारतात आणण्याचा निश्चय केला. या हसणाऱ्या पाणघोड्याच्या आगमनापूर्वीच देशभरातील माध्यमांनी त्यांची दखल घेतली आणि या हसणाऱ्या पाणघोड्याविषयी कुतूहल निर्माण केले. हॅरीसन आणि त्याच्यासोबत मेसी अशी नरमादीची जोडी भारतात आणण्यात आली. भारतात आल्यावर हॅरी हसणं विसरुन गेला. त्याचे हसणे बंद झाले आणि मंत्रिमहोदयांचे टेन्शन वाढले. हॅरी हसण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. वेगवेगळ्या पद्धतीचे उपचार झाल्यावर प्राणी संग्रहालयाच्या व्यवस्थापकाने सारी सूत्रे हाती घेतली. हॅरी आणि मेसीला वेगवेगळ्या प्रकारे टोचून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा प्रयत्न झाला. त्यांना विजेचा शॉक दिला. त्यात मेसीचे निधन झाले. पुन्हा मंत्री महोदयांच्यावर टीका होऊ लागली. त्यानंतर एका रात्री हॅरी हर्षवायू झाल्यासारखा हसला आणि न थांबता हसत राहिला.

जनतेला हसणाऱ्या हॅरीबरोबर सेल्फी काढता येईल! लोक अक्षरशः धावत सुटले, लांबच लांब रांग लागली प्राणिसंग्रहालयाच्या दारात. उन्हातान्हात, बोचऱ्या वाऱ्यात, पावसाच्या धारांतही लोक रांगेत उत्साहाने उभे होते. न भिता हॅरीपाशी येऊन त्यांच्या जांभळ्या जखमी मस्तकावर अलगद हात टाकून हसत हसत सेल्फी काढत होते. हॅरीही हसत होता. मात्र दोघांच्या हसण्यात फरक आहे हे कुणालाच कळलं नाही. पृ.११८

कथेच्या या समारोपातून लेखकाने वाचकांसमोर अनेक प्रश्न ठेवले आहेत. हॅरीच्या हसण्यातली अगतिकता इथे दिसते तर जनतेच्या मूळ प्रश्नांना बगल देत जनतेलाही मूर्ख बनवत हसायला लावल्याचे चित्र येथे दिसते.

मुस्लिम साहित्यिकातील नामवंत लेखक म्हणून रफिक सुरज यांना ओळखले



Scanned with OKEN Scanner

जाते. मुस्लिम मराठी साहित्यिकात त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांचे आभाळ, बेबस, पायाड हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. रहबर ही कादंबरी तर सोंग घेऊन हा पोर हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. रहबरसाठी त्यांना अण्णाभाऊ साठे पुरस्कार तर सोंग घेऊन हा पोरसाठी बहिणाबाई चौधरी पुरस्कार प्राप्त झाला आहे. या कथासंग्रहात त्यांची 'घुसमट' ही कथा समाविष्ट आहे.

नवऱ्याने टाकलेल्या आणि आजारी असलेल्या स्त्रीचे कसे हाल होतात हे या कथेतून सांगितले आहे. आपणच आई-वडील आणि भावावर बोजा झालेलो असताना, आपल्या मुलीला पुन्हा ठेवून घेणे कसे जड जाते, मुलगी आपणाजवळ ठेवता येत नाही आणि तिला वडिलांच्याकडेही पाठवताना होणारी वेदना याचे चित्रण या कथेत आले आहे. मुलीशिवाय आणि पतीशिवाय एका मुस्लिम स्त्रीची होणारी घुसमट हा या कथेचा आशय आहे.

पहिल्या बाळंतपणानंतर दुसऱ्या बाळंतपणात बानूची अवस्था बिकट होते. पोटातील दुसरे बाळ ही जाते आणि पुन्हा बाळ होण्याची शक्यता मावळते. त्यावेळी वंशाला दिवा पाहिजे म्हणून तिचा नवरा तिच्याशी संबंध तोडतो. तिच्या न्याय हक्कासाठी तिचे वडील वा इतर कोणी तिच्या सासरवाल्यांशी भांडत नाहीत. या धक्क्याने बानू खचते. आई-वडिलांच्याकडेच राहते. तिची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत जाते. पहिली मुलगी नवऱ्याकडेच असते. बानूची स्थिती बिकट होत आहे म्हटल्यानंतर बानुला तिची मुलगी भेटावी म्हणून बानूचा भाऊ शानू आणि काही गावचे नागरिक तिच्या नवऱ्याशी वाद घालून मुन्नीला घरी आणतात. आपल्या मुलीला पाहिल्यावर बानू खूप आनंदी होते. बानूची आई सायरा हिलाही आनंद होतो. मुन्नीला मिठीत घेऊन बानु आपले अश्रू गाळू लागते. त्यावेळी पाहणाऱ्या स्त्रिया म्हणायला लागल्या, इतकी वरसं घरात कोंडून घेऊन तब्येतीचं मातरं करून घेटलं. मरायला टेकली तरी अजून नवऱ्याच्या नावानं डोरलं गळ्यात हाय. पर त्या उफराट्या काळजाच्या भाड्याला जरा तरी पाजर फुटलाय का बगा. जरा वाट वाकडी करून दोन मिन्ट बायकूला बगून तरी गेला का बगा वाद्या! पृ.१२२ नवऱ्याने सोडल्यानंतरही कोणालाही दोष न देता बानू आतल्या आत झुरत राहिली. तिची होणारी घुसमट स्त्रियांना समजत होती. मुन्नी काही दिवस राहिल्यावर पुन्हा घरच्यांना मुन्नीही जड वाटू लागली. मुन्नीला घरात आणणारा तिचा मामा तिला तिच्या घरी वडिलांच्याकडे सोडण्यासाठी घेऊन निघाला. त्यावेळी मुन्नी रडायला लागली. आईला पकडून ती अधिकच रडत होती पण इथे कोणावरही काही फरक पडत नव्हता. अक्षरशः तिला बानूपासून



ओढून नेली आणि पुन्हा बानूचे दिवस बदलले. मुलीच्या येण्याने तिच्या जीव[illegible] थोडाफार आनंद निर्माण झाला होता. तोही आता नाहीसा झाला. पुन्हा [illegible] जीवन विरान वाळवंट बनले. मुन्नीही तुमची जगण्याची आशा होती पण तीही आता तिच्यापासून दूर गेल्यानंतर बानू पुन्हा हतबल होते. पुन्हा तिची घुसमट सुरू होते. ही तिची घुसमट न सांगता येणारी आणि तिला मात्र आतून पोखरून काढणारी अशी आहे. स्त्री जीवनात नवऱ्याकडूनही छळवणूक होते आणि माहेर कडूनही तिला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. हे दुःख या कथेच्या केंद्रस्थानी आहे. बानू आपल्या नवऱ्यापासून तर दूर झाली आहेच पण आता ती आपल्या मुलीपासून तुटत चालली आहे याचेच वास्तवदर्शी चित्र या कथेत आले आहे.

मराठीतील दर्जेदार ग्रामीण लेखक म्हणून अशोक कौतिक कोळी यांना ओळखले जाते. त्यांचे आसूड, कुड हे कथासंग्रह प्रकाशित आहेत. कुंधा, गावाच्या तावडीतून सुटका, पाडा, रक्ताळलेल्या तुरी या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. अमळनेर येथील २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या खानदेशी बोली साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. ग्रामीण जीवनातील धगधगीत वास्तव त्यांच्या साहित्यातून प्रकटले आहे. या कथासंग्रहात त्यांची 'चुराडा' ही कथा आली आहे.

शेतकरी डोळ्यात स्वप्ने घेऊन, आपल्या रक्ताचे पाणी करून शेतात पीक घेत असतो. पण त्याने हे आणलेले पीक नैसर्गिक संकटात मातीमोल होऊन जाते. शेतकऱ्याच्या स्वप्नांचा आणि त्यांच्या कुटुंबाच्या स्वप्नांचाही चुराडा होऊन जातो. हे वास्तव या कथेत आले आहे.

कथेचा नायक शिवा हा पारंपरिक पिकांना फाटा देत आपला मित्र शालिमार भाई यांच्या सल्ल्याने टरबुजाची शेती करतो. शिवा आणि त्याची बायको सायजाबाई यांनी अनेक स्वप्न रंगवली. मुलगी सारंगीला इंग्रजी आणि गणिताचे क्लास लावले जाणार होते, सायकल घेऊन दिली जाणार होती, नव्या पुस्तक वह्या आणि नवे कपडे घेतली जाणार होती. मुलग्याला तर कोट्याला टाकले जाणार होते. खूप खूप स्वप्न घेऊन ती टरबुजाची बाग बहरली होती. ती नेऊन विकावी आणि त्याचे पैसे आपल्या हाती येतील आणि आपली स्वप्न पूर्ण होतील असे वाटत असताना. कोरोनाचे वादळ जगभर घोंगावायला लागले. महामारीने जगात हाहाकार उडवून दिला. त्याला अटकाव करावा म्हणून सरकारनं तातडीनं पावलं उचलली.....लाकडावून......... संचारबंदी..... काय काय झालं..... वाहतूक बंद.....सनवार बंद.....मालाची ने आन सगळं सगळं बंद...सगळं सगळं थांबलं...

होत्याचं नव्हतं झालं...... शिवाचं कुटुंब धायमोकलून रडू लागलं...... त्याच्या सपनातली बाग जळून, करपून गेली, मलूल झाली...... लाल टरबुजं काळेनिळे पडले..... सडून गेले.... एकेकाच्या स्वप्नांचा अक्षरशः चुराडा झाला.... पृ.१४०

खूप कष्टाने उभा केलेला मळा शेतातच सडून गेला. शिवा आणि शायजाच्या स्वप्नांचाही चुराडा झाला. शेतकऱ्याच्या स्वप्नांचा होणारा चुराडा आणि त्याच्या व्यथावेदनांचे न संपणारे दुःख या कथेतून व्यक्त झाले आहे.

अलीकडल्या कालखंडातील एक महत्वपूर्ण नवलेखिका म्हणून शिल्पा कांबळे परिचित आहेत. स्त्रीवादी लेखिका व आंबेडकरवादी विचारांच्या लेखिका म्हणून त्यांची ओळख आहे. 'निळ्या डोळ्यांची मुलगी' ही त्यांची कादंबरी तर बिर्याणी हे नाटक प्रसिद्ध आहे. 'नऊ चाळीसची लोकल' हा त्यांचा संग्रह प्रकाशित आहे. आपल्या समाजातील स्त्रियांची सुखदुःखे त्यांनी जवळून पाहिली आहेत. कोणत्याही जाती धर्मातील स्त्रियांच्याच वाट्याला दुःख आणि वेदना अधिक येते. या वास्तवाचे भान आल्याने त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी स्त्री असल्याचे दिसते. या कथासंग्रहात **'मांजरींनाही घर असतं'** ही त्यांची कथा आहे. पाळीव प्राण्यांच्या विषयी असणारे जनमाणसातील समज आणि बदलती जीवनपद्धती हा आशय घेऊन ही कथा प्रकटते. या कथेच्या नायिकेला मांजरी पाळण्याचा छंद आहे. तिच्या घरात पंधरा-वीस मांजरी आहेत. त्यांना तिने मिनी, बारकी मिनी, कतरीना, गोरी कतरीना, काळी पिंकी, प्रियांका, इंग्लिश प्रियंका अशी वेगवेगळी नावे दिली आहेत. नायिकेच्या मावशीचे पती म्हणजेच काका खूपच श्रीमंत आहेत. तर नायिका आपल्या प्रियकरालाही काकाच म्हणते. त्याचे पूर्वीचे लग्न झाले असून त्याने घटस्फोटही घेतलेला नाही. त्यांच्या मुलाचे शिक्षण सुरू आहे तर आईस कॅन्सर आहे हे नायिकेला काकाची बायको ऑफिसमध्ये येऊन भांडल्यावर समजते. मिनी मांजरीचे रोड अपघातामध्ये निधन होते. त्यानंतर नायिका खूप दुःखी होते. या दुःखातून तिला बाहेर पडण्यासाठी तिचा प्रियकर काका हे मदत करतात. ते तिच्यापेक्षा वयाने मोठे आहेत. तिच्या पूर्वीच्या ऑफिसमध्ये ते तिचे बॉस होते. नायिकेच्या घरीही काकांची पहिली पत्नी येऊन हंगामा करून जाते. त्यानंतर नायिकेच्या घरचेही यांच्या लग्नाला परवानगी देतात. पुढे नायिकेच्या प्रियकराची नोकरी जाते. एक दिवस काका येऊन नायिकेच्या घरीच राहतात. पुढे त्यांना नवी नोकरी मिळते. त्यानंतर काकांनाही मांजरींचा लळा लागतो. नायिका नसल्यानंतर काका असले तरी मांजरी शांत राहतात. पुढे काका आपला अर्धा पगार नायिकेच्या आईकडे देतो तर अर्धा पगार त्याची



बायको येऊन घेऊन जाते. काकाला मांजरींचा वाढदिवस करण्याची कल्पना सुचते आणि ते दोघेही ही कल्पना अमलात आणतात. मांजरीच्या या वाढदिवसालाही मोजकेच लोक येतात. नायिकेची मावशी येत नाही पण काका येतात. या मांजरीसाठी बोका पाठवू का? असे म्हणून जातात. नायिकेला हे खटकते. त्यानंतर चाळीतील लोकही त्यांच्याकडे पाहून कुजबुजत राहतात. नायिकेच्या आईचेही कान भरतात. त्यावेळी नायिका म्हणते की, ती कधी कधी इमोशनल होऊन मला विचारते, पुढे तुझं काय होईल.... आता तिला कसं सांगायचं की रिसेशनच्या या काळात कुणाचं काही महिन्यांनी काय होईल हे कुणाला माहीत नसतं. मग मी तिला धीर देत सांगते की काका माझ्याबरोबर असेपर्यंत माझं काहीच वाईट होणार नाही. तसंच मी असेपर्यंत माझ्या मांजरींचं वाईट होणार नाही..... काही झालं तरी शेवटी मांजरींनाही घर असतंच ना! पृ.१४६

अशाप्रकारे या कथेचा शेवट होतो. यातील नायिका ही धीट आणि परंपरागत व्यवस्थेतून बाहेर पडलेली आपणास दिसते. समाजात फारसा दिसून न येणारा मांजरी पाळण्याचा छंद या नायिकेचा इतरांपेक्षा वेगळा छंद दिसतो. त्याचबरोबर आपल्यापेक्षा मोठ्या आणि विवाहित पुरुषाशी लग्न करण्याचे धैर्य दाखवत, त्याच्या आधारावर आपले काहीच वाईट होणार नाही हे ती आत्मविश्वासाने सांगते. समाजात प्राण्यांविषयी असणारे परंपरागत समज, परंपरागत कुटुंब व्यवस्थेला धक्का देत नायिकेची आधुनिक विचारसरणी येथे प्रकटलेली आहे. नायिका आपणास हवे तसे मनमोकळेपणे जगण्याचा प्रयत्न करताना दिसते. जननिंदेला व समाजनिंदेला न घाबरता ती आपली वाट चोखाळताना दिसते.

एकविसाव्या शतकातील नवकथाकार म्हणून विवेक कडू हे सर्वांस परिचित आहेत. मानव समाज आपल्या बरोबरच निसर्गाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास करत आहे. मानवी समाजात चाललेल्या या प्रगती अधोगतीच्या विचारातील कल्लोळाचे चित्रण त्यांच्या कथेतून होताना दिसते. 'चार चपटे मासे' हा त्यांचा कथासंग्रह २०२२ मध्ये शब्द पब्लिकेशनने प्रकाशित केला. भोवतालच्या समाजाचे केलेले अचूक निरीक्षण लेखकाने आपल्या कथेतून नोंदवले आहे. त्यांची या कथासंग्रहात **'केमिकलची बोय आणि सारिंगा'** ही कथा आली आहे. मानवाने आपल्या प्रगतीसाठी औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात केले. त्यासाठी त्यांनी मोठमोठ्या एमआयडीसी उभ्या केल्या. विकासाच्या या वेगवेगळ्या संकल्पना राबवत असताना निसर्गास हानी पोहोचू नये याची काळजी घेण्याची जबाबदारी माणसावरच होती.



Scanned with OKEN Scanner

पण ही जबाबदारी घेणारी माणसेच विकली गेली. त्यामुळे औद्योगीकरणाच्या या प्रगतशील व्यवसायातून, उद्योगधंद्यातून निघणारे दूषित पाणी, दूषित हवा ही निसर्गात सोडली गेली. ते दूषित पाणी, विषारी वायू सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी कसा खेळ करत आहेत याचे वास्तवदर्शी चित्रण या कथेत आले आहे.

ही कथा बोय माशाची आहे. खाडीपट्टीत नदीच्या खाडीमुखाच्या तोंडावर हे मासे आढळतात. सातपाटी खारेकुरण, मुरबे, नवापूर, नांदगाव इत्यादी गावाजवळच्या खाडी भागात हे मासे आढळतात. कंपनीत काम करणाऱ्या पंकजला आपल्या पगार वाढीसाठी मॅनेजरला मासे खाऊ घालायचे आहेत. त्यासाठी तो मार्केटला मासे खरेदीसाठी जातो. पण तेथे चांगले मासे न मिळाल्यामुळे त्याला नाईलाजाने बोय मासा घ्यावा लागतो. तेथूनच बोय मासा आपली कहाणी सांगतो. प्रसिद्ध असणारा बोय मासा खाडीपट्ट्याच्या किनारी झालेल्या औद्योगिकरणाने आपली चवच विसरून गेला आहे. औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाले आणि त्यातून उत्सर्जित होणारे विषारी पाणी खाडीत सोडले गेले. केमिकल युक्त आणि दूषित पाणी तेथील जीवजंतूंच्या आणि माशांच्या नाशास कारणीभूत होऊ लागले. नदीकिनारी राहणारी सारिंगा या मुलीस या बाहेर पडणाऱ्या मासळ्या व माशांविषयी आत्मीयता वाटत होती. ती त्यांना पाण्यात सोडून जीवदान देत होती. केमिकलच्या पाण्यामुळे मरणाऱ्या माशांचा थर पाहून ती अस्वस्थ होत होती. तिच्या बापाचाही रोजगार हरवला गेला होता, कारण मासे त्याला आता जाळ्यात सापडत नव्हते. येथील माशांनाही बाजारात फारशी किंमत नव्हती. हे मासे केमिकल युक्त झाले होते. बोय मासा ही अस्वस्थ होतो. तो जमिनीत शिरण्याचा प्रयत्न करतो पण जमिनीतही केमिकलचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात दिसते. सारे पाणी दूषित केलेच आहे पण जमीनही दूषित झाली आहे. शेवटी सारंगीच्या आईला मदत करण्यासाठी बोय मासा स्वतःहून तिच्या वडिलांच्या जाळ्यात जातो. तेथून तो जमनाबाईच्या मार्केटमध्ये जातो. जमनाबाईकडून तो पंकजला विकला जातो. पंकज आपल्या मॅनेजरला तो मासा तळून तयार करून देतो. मॅनेजर आपल्या अधिकाऱ्याला तो भरवतो. आपले सारे आयुष्य केमिकलने विषारी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या पोटामध्ये जाऊन हाच बोय मासा त्याचे पोट ढवळून टाकतो. आजपर्यंत पाणी दूषित असतानाही चांगले आहे म्हणून अहवाल देणाऱ्या या अधिकाऱ्यावर सूड उगवण्याचे समाधान बोय मासा मिळवू पाहतो. पण एकट्या अधिकाऱ्याला अद्दल घडवून सारी भ्रष्ट व्यवस्था बदलता येणार



नाही हे वास्तव अधोरेखित करताना लेखक म्हणतो,

तारापूरचा भोपाळ होणार या लेखांना अजिबात भीक घातली जात नाही त्याचं काय?

कोणत्या केमिकलने मासे मेले हे माशांच्या शवविच्छेदन अहवालाने अजूनही सिद्ध करता येत नाही, त्याची प्रयोगशाळाही इथे नाही. त्याचं काय?

ज्यांना अपरिहार्यपणे आपलं खाणं आणि आपली पारंपारिक चव सोडता येत नाही ते या कडवट चवीसह हे मासे खातात, त्यांचं काय?

हरित लवादाने ठोठावलेल्या दीडशे कोटींच्या दंडाने ती पूर्वीची खाडी पुन्हा जिवंत करता येईल....... हजारो जीव नामशेष झाले.... त्याचं काय?

सारिंगाची आई गेली. बापही असून नसल्यासारखा. तिला आता सारखी स्वप्न पडतात. त्या स्वप्नांचं काय? पृ.१६१

या औद्योगिकीकरणाच्या रेट्यात माणसांचेच नाही तर प्राण्यांचेही विषारीकरण झाले आहे. खाडीपट्टा उद्ध्वस्त होत आहे. जीवजंतूच नाही तर माणूसही हद्दपार होत आहे. हे भयानक वास्तव या कथेच्या माध्यमातून लेखकाने वाचकांसमोर ठेवले आहे. कथेचा शेवट अस्वस्थ करणारा आणि माणसाला विचार करायला लावणारा आहे.

अलीकडल्या कालखंडातील तरुण लेखक, संपादक, अनुवादक म्हणून प्रणव सखदेव यांना ओळखले जाते. त्यांच्या काळी करडी स्ट्रोक्स या कादंबरीस २०२१ चा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार प्राप्त झाला आहे. आपल्या करिअरची सुरुवात त्यांनी लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स या दैनिकात उपसंपादक म्हणून सुरू केली मात्र आपला कल पुस्तक संपादनाकडे आहे हे जाणून ते पुस्तक प्रकाशन क्षेत्राकडे वळले. गेली काही वर्ष ते रोहन प्रकाशन सारख्या मराठीतील मान्यवर प्रकाशन संस्थांशी संपादक, अनुवादक आणि लेखक म्हणून संलग्न आहेत. दिमित्री रियाझ केळकाराची गोष्ट, नाभीतून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य, निळ्या दाताची दंतकथा आणि इतर कथा हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहे. पायऱ्यांचा गेम आणि इतर कविता हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे.

नवनवे प्रयोग करणे हा त्यांचा छंद आहे. मग हे नवप्रयोग खाण्यातील असो वा लेखनातील असो हे दोन्ही त्यांचे आवडीचे विषय आहेत. या कथासंग्रहात त्यांची हा 'खेळ आयडेंटिटी थेफ्टचा' ही कथा आली आहे. समाजाच्या बदलत्या वर्तमानात माणूस आपली स्वतःची ओळख हरपत चालला आहे. व्हॉट्सप, फेसबुक, ट्विटर यासारख्या ई मीडियाच्या माध्यमांनी मानवी जीवनात अंतर्बाह्य

बदल केला आहे. या माध्यमांच्या वापरामुळे माणसाला स्व अस्तित्वाचा विसर पडला आहे. प्रत्येकाला दुसऱ्यासारखे बनण्याचा मोह आवरताना कठीण होत आहे. त्या मोहाला बळी पडून, आपले स्वतःचे अस्तित्व भडक करण्यासाठी आयडेंटिटी चोरीचा खेळ करावा लागतो आहे. हे या कथेचे आशयसूत्र आहे. कथेच्या प्रारंभीच लेखकाने निवेदक आपली ओळख फेसबुकवर कशी बदलतो यावरती मांडणी केली आहे. त्याबरोबरच व्यक्तिगत जीवनातही आपण आपल्या मनासारखे न जगता कोणाच्यातरी आग्रहाखातर जगत असतो. तीच आपली ओळख बनत असते. स्वतःची आयडेंटिटी लपवली जाते. निवेदकात लेखक दडला आहे याची जाणीवही एक स्त्री करून देते. तिच्या वारंवार म्हणण्याने निवेदकाला आपल्यात लेखक दडला आहे याचा साक्षात्कार होतो. तीच त्याच्यातील लेखकाला नवी ओळख देऊन स्वतः मात्र नाहीशी होते. निवेदक ती भेटत नाही म्हणून खूपच नाराज होतो. तिने दिलेल्या मार्गावर चालत राहतो. आपल्या पोस्टला लाईक मिळवत राहतो. त्यात समाधानी राहतो. पुढे विहंग आणि मनीषाची कथा येते. दोघेही लग्नानंतरही एकमेकांचा आदर करत आपली ओळख कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. विहंगच्या मनात चाललेला संघर्ष त्याला त्याची ओळख बदलायला भाग पडतो. त्यातूनच हा आयडेंटी थेप्टचा खेळ रंगताना दिसतो. शेवटी कथेतील पात्रांना ओळख देणारा लेखकच असतो. तो त्यांना आपणास हवे तसे कथेत रूप देत राहतो. हे सांगताना शेवटी निवेदक म्हणतो, तर मी आहे एक ऑफिस बॉय, फेसबुकवर मला हवी असलेली इमेज तयार करण्यासाठी हवा तसा प्रोफाइल तयार करणारा युझर, आणि ही गोष्ट रचणारा लेखक. आता या सगळ्यावरून तुम्ही खुशाल रचा माझ्या आयडेंटिटीची इमारत, तुम्हाला हवी तशी! पृ.२००

अशाप्रकारे पात्रांना ओळख देणारे आपणच आहोत हे लेखकाने शेवटी सांगितले आहे. आपण आपली ओळख बदलण्याचा प्रयत्न न करता, जसे आहोत तशी ओळख ठेवणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे 'कथारंग' या कथासंग्रहात बारा कथांच्या माध्यमातून मानवी जीवनाचा रंग मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी जीवनातील प्रचंड उलतापालथीचे, बदलत चाललेल्या वर्तमानाचे, अस्वस्थ असणाऱ्या भोवतालचे चित्र घेऊन या कथा प्रकटतात. जागतिकीकरणाच्या रेट्यात हरवत चाललेले माणूसपण आणि पोकळ होत चाललेली नाती या साऱ्यावर या कथा भाष्य करतात. जटिल होत चाललेल्या मानवी समस्या, नवनवी शासकीय धोरणे, समाज माध्यमांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास असे अनेक पदर उलगडणाऱ्या या कथा आहेत. कथारंग हा कथासंग्रह आशयाच्या दृष्टीने संपन्न आणि सघन बनला आहे.

• •


• संदर्भ

१. कथा संकल्पना आणि समीक्षा, सुधा जोशी, मौज प्रकाशन ग्रह, प्रथम आवृत्ती १ फेब्रुवारी २०००

२. मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल, डॉ. सतीश बडवे, शब्दालय प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जानेवारी २०१७,

३. कथारंग, डॉ. विनोद कुमरे आणि इतर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, ऑगस्ट २०२२



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College
Arts & Commerce, Pachal

प्राचार्य
श्री. मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ
आर्टस् अँन्ड कॉमर्स, पाचल
मु.पो. रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी -४१६७०४





Scanned with OKEN Scanner

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system, or transmitted in any form or be any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthoirzed act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १३९६
- 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान' (समीक्षा – संदर्भ)
- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे – ४११ ०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई–मेल : snehaltawre@gmail.com
- © S R I
- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे
- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे
- **अक्षरजुळणी :** एस. एस. ग्राफिक्स, पुणे
- **ISBN 978 - 93 - 91033 - 31 - 6**
- **पृष्ठसंख्या :** १८८
- मूल्य : ₹ ३००/–

**वैश्विक पातळीवर विविध प्रकारच्या**
**भूमिका यशस्वीरित्या करणाऱ्या,**
**चैतन्यमयी असणाऱ्या, आपल्या कार्यकर्तृत्वाची**
**मोहोर उमटविणाऱ्या सर्व पुरुष कर्तृत्वांना...**

**आदरपूर्वक सस्नेह अर्पण...**

**संपादक**

Scanned with OKEN Scanner

२१) राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य : समाज व सत्यशोधक समाजाविषयीची भूमिका – एक विश्लेषण — डॉ. प्रशांत साबळे /९०

२२) सावित्रीबाई फुले दत्तकपालक योजना जागतिक पातळीवर राबविणे आजच्या काळाची प्रमुख गरज – एक समाजशास्त्रीय अभ्यास — डॉ. यादव घोडके /९४

२३) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य व शेती विषयक विचार — डॉ. पी. बी. सिरसट/९८

२४) महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा विचारांच्या पुन:प्रस्थापनेत योगदान — डॉ. योगीराज उरकुडे/१०२

२५) शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ : यशवंतराव चव्हाण — डॉ. स्नेहल मराठे/१०६

२६) ज्ञानपीठकार – वि. दा. करंदीकर — डॉ. नामदेव गवळी/११०

२७) रवींद्र ठाकूर यांची कादंबरी : समाजशास्त्रीय दृष्टिकोन — डॉ. विनोद राठोड/११४

२८) केशिराज पंडित तथा केसोबास – व्यक्तित्व आणि ग्रंथकर्तृत्व — डॉ. वैशाली भालसिंग/११८

२९) संत गाडगे महाराज : महाराष्ट्रातील अध्यात्म परंपरेचा वारसा जतन करणारे संतपुरुष — डॉ. निलेश लोंढे/१२२

३०) युग प्रवर्तक – राजर्षी शाहू महाराज — डॉ. चारुशीला लोखंडे/१२६

३१) डॉ. पंजाबराव देखमुख यांचे कृषी क्षेत्रातील आर्थिक विचारातील योगदान — डॉ. प्रियंका खोसे/१३०

३२) पंडित मदन मोहन मालवीय या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे शैक्षणिक योगदान — डॉ. संदीप भुयेकर/१३४

३३) झुंजार गोमंतकीय मराठी पत्रकार – गोविंद पुंडलिक हेगडे – देसाई — डॉ. वृंदा केळकर /१३८

३४) डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील : शिक्षण क्षेत्रातील शुक्रतारा — प्रा. डॉ. नम्रता बागडे /१४२

३५) कोकणी भाषेतील पहिले ज्ञानपीठकार रवींद्र केळेकर — डॉ. हनुमंत चोपडेकर /१४६

३६) स्वातंत्र्य सेनानी आबा नारकर — डॉ. विकास पाटील/१५०

३७) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शैक्षणिक विचारांची ओळख — प्रा. डॉ. काळुराम भिसे /१५४

३८) लोकजीवन आणि लोकसंस्कृतीवर — डॉ. महादेव गायकवाड /१५८

३९) सरस्वती सन्मान पुरस्कार प्राप्त गोमंतकीय लेखक महाबळेश्वर सैल यांचे साहित्यातील योगदान — डॉ. प्राची जोशी /१६१

४०) अर्थही कन्या परकीय एवं — डॉ. ज्योती सोनवणे /१६५

४१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे शैक्षणिक विचार — डॉ. सदाशिव शिंदे /१६९

४२) डॉ. प्रल्हाद अ. कुलकर्णी : एक मनस्वी साहित्यिक — डॉ. वैशाली कुलकर्णी /१७३

४३) साहित्य, समीक्षक, बहुअवधानी – प्रा. जवाहर मुथा — प्रा. डॉ. राजू रिक्कल /१७६

४४) आचार्य रजनीश यांचे आध्यात्मिक क्षेत्रातील योगदान — डॉ. मारुती बामणे /१८०

४५) माळरानावर आनंदवन फुलविणारे : महामानव बाबा आमटे — प्रा. डॉ. क्रांती पैठणकर /१८४


Scanned with OKEN Scanner

# स्वातंत्र्य सेनानी आबा नारकर

डॉ. विकास शंकर पाटील

स्वातंत्र्य चळवळीने देशभर जोम धरलेला असताना पाचल परिसरातही स्वातंत्र्य चळवळ जोमाने चालवणारे त्याचबरोबर व्यसनाधिनतेविरुद्ध व जातीयते विरुद्ध कठोर आवाज उठवणारे, पाचल परिसरात सहकार चळवळ जोमाने चालवणारे, स्त्री शिक्षण आणि स्त्री सन्मानाचा आग्रह धरणारे, शैक्षणिक चळवळीची सुरुवात करणारे नेतृत्व म्हणून गो.बा. ऊर्फ आबा नारकर यांच्याकडे पाहिले जाते. पाचल परिसरातीत सह्याद्रीतील गांधी म्हणून त्यांची ओळख आहे. इसवी सन १९३०तर स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून देऊन काम करणारे आबा नारकर हे रत्नागिरी जिल्ह्यातील थोर स्वातंत्र्य सेनानी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या जीवन कार्याचे अल्पशे दर्शन घेऊ.

**बालपण व शिक्षण**

आबांचा जन्म १९०८ मध्ये झाला. त्यांना एक लहान भाऊ व पाच बहिणी होत्या. लहान भाऊ लहान असतानाच वारला. त्यांच्या सखू व मुक्ता या बहिणी विवाह झाल्यावर लवकरच गेल्या. तर सुंदरा आणि भीमाबाई या गावातच होत्या. आबांचे आई-वडील आबा लहान असतानाच गेले. आबांची आर्थिक परिस्थिती खूप चांगली होती. आबांनी चौथीपर्यंत शिक्षण गावात पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते सासवण्याच्या राष्ट्रीय शाळेत शिकायला गेले. तेथील वैश्यविद्या आश्रमामुळे ते स्वातंत्र्य चळवळीकडे वळले. तिथेच त्यांनी मॅट्रिक समकक्ष पदवी प्राप्त केली. चौथीनंतर १९२१ ते १९२८ पर्यंत सात वर्षे आबा या ठिकाणी विद्यार्थी दशेत होते. तिथेच त्यांच्या जीवनावर महात्मा गांधींच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव पडला. उच्च शिक्षणाची ओढ त्यांना पुण्याकडे घेऊन गेली. पुण्याच्या टिळक विद्यापीठात ते उच्च शिक्षणासाठी दाखल झाले आणि त्या ठिकाणी त्यांना आचार्य जावडेकर, आचार्य भागवत यांसारख्या महान गुरूंचे सानिध्य आणि मार्गदर्शन लाभले. तेथे ज्ञानाची नवनवी क्षितिजे विस्तारत गेली. त्यातूनच ते पुढील वर्षी पुण्यापासून शेकडो मैल दूर असणाऱ्या मदन मोहन मालवीय यांनी सुरू केलेल्या बनारसच्या काशी विद्यापीठात दाखल झाले. आचार्य नरेंद्र, श्री प्रकाशजी यांच्यासारखे महान गुरू त्यांना लाभले. त्या कालखंडात काशी हे उच्च शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय चळवळीचे एक महत्त्वाचे केंद्र होते. महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या लढ्यात अनेक महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होऊ लागले. पुढे गांधीजींची दांडी यात्रा सुरू झाली आबा ही या लढ्यात सहभागी



आबांचा गांधीजींच्या दांडी यात्रेपासून स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग सुरू झाला आणि याच लढ्यात त्यांना प्रथम तीन दिवसाची तर नंतर ४० दिवसांची शिक्षा झाली. दोन्ही वेळा त्यांनी ठाणे जेलमध्ये शिक्षा भोगली. त्यानंतर राजापूर तालुक्यातील आपल्या पाचल गावी ही स्वातंत्र्याची चळवळ सुरू व्हावी म्हणून आबा पाचलला आले. पाचलला आल्यावर त्यांनी दारू गुत्यावर पिकेटींग करण्याचा कार्यक्रम निश्चित केला पण या कार्यक्रमास तेथील पोलिसांनी विरोध केला. आबांच्या पाठीशी एकही कार्यकर्ता नसताना आबांनी हे आपले आंदोलन पूर्ण केले. आबांना अटक झाली. पुढे जामीनावर सुटका झाल्यावर आबांनी लोकात जनजागृती सुरू केली आणि तेथील तरुणांचा पाठिंबा आबांना मिळू लागला. पुढे १९३२ मध्ये आबा सासवणे येथे शिक्षक म्हणून रुजू झाले. याच काळात १९३४ मध्ये त्यांचा विवाह कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील सुशीलांशी झाला

**१९४२ चा लढा**

या लढ्यात आबांनी भूमिगत राहून लोकात जनजागृती करणे, स्वातंत्र्य चळवळ वृद्धिंगत करणे, लोकांच्यातील भीती कमी करणे, सभा, मिरवणुका व गाठीभेटीद्वारे लढ्याचा हेतू समजावून सांगणे अशी कामे केलीत. आबा मुख्यतः समाजवादी गटाशी संबंधित होते. त्यांना अच्युतराव पटवर्धन, एस. एम.जोशी, नानासाहेब गोरे, साने गुरुजी यांचे मार्गदर्शन लाभले होते. 'क्रांतिकारी' हे बुलेटीन पाचला येई. त्या बुलेटिनच्या प्रती काढून अण्णा आणि त्यांचे सहकारी लोकात वाटत असत. या लढ्यात आबांच्या बरोबर त्यांचे सहकारी अण्णा वायकुळ, अण्णा रेडीज, अण्णा लब्दे, ज्ञानदेव नारकर, नामदेव भिंगार्डे, सावंत हे प्रमुख शिलेदार होते. या लढ्यात स्त्रियांनीही सहभाग घेतला. यामध्ये अण्णा वायकुळांच्या पत्नी शोभनाताई वायकुळ, आबांच्या पत्नी सुशीलाताईही होत्या.

**स्वातंत्र्यानंतरचे कार्य**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही अण्णांनी आपले लोकसेवेचे कार्य अविरत सुरू ठेवले. त्यांनी कोकणातील खोतांच्या विरुद्ध आवाज उठवला. गावागावात जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून खोती विरोधात शासनाकडे संघटित शेतकऱ्यांचे ठराव पाठवले. त्यांच्या विरुद्ध आवाज उठवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अंधश्रद्धेविरुद्ध ही लढाई सुरू केली. आबा स्वतः विज्ञाननिष्ठ, बुद्धिनिष्ठ होते. त्यामुळे कोणत्याही कर्मकांडावर त्यांनी कधीही विश्वास ठेवला नाही. अंधश्रद्धेचे कारण अज्ञानात आहे हे त्यांना पटले होते. अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी जनजागृती मोठ्या प्रमाणात केली. त्यांनी कविता रचल्या आणि त्या लोकप्रिय झाल्या.

'भुताटकी हे खुळ असे हो । अर्थ नसे त्यामधी काही ।
सोडून द्या हा नाद सांगतो । नम्रपणे गोपाळ कवी ।।'[१]

यांसारख्या कवितांमधून अंध:श्रद्धेत वेळ जातो आणि रोगावर वेळीच



Scanned with OKEN Scanner

**शैक्षणिक कार्य**

अंध:श्रद्धेचे मूळ अज्ञानात आहे हे ओळखून आबांनी शैक्षणिक कार्य हाती घेतले. १९३७ साली स्थापन झालेल्या ग्राम सेवा संघाचे काम त्यांनी लांज्यात राहून सुरू केले. संघाच्या अष्टवार्षिक वृत्तांतातील उद्देशिकेत आबा म्हणतात की शिक्षण सर्व सुधारणांचा पाया आहे. शिक्षणाचे अभावी ग्रामीण जनतेची पिळवणूक होत आहे. केवळ अज्ञानामुळे खेड्यातील लोक आपल्या हिताच्या गोष्टीलाही विरोध करीत असतात. कोणत्याही नवीन गोष्टीकडे संशयाने पाहतात. त्यामुळे ग्रामीण कार्यकर्त्याला अज्ञान आज आपल्या मार्गातील पहिला व मोठा अडथळा वाटतो म्हणून संघाने शिक्षण प्रसाराचे काम प्रथम हाती घेतले.[२]

येथील लोकांची शिक्षणाची गरज आबांनी जाणली होती. आपल्या पाचल परिसरात असणारी दुर्गमता आणि तेथे शिक्षणाचे असणारे नगण्य प्रमाण विचारात घेऊन त्यांनी एक १ जुलै १९३९ ला कोंड येथे व्हॉलेंटरी शाळा सुरू केली. या शाळेत नामदेवनाना भिंगार्डे, अण्णा रेडीज आदी मंडळींनी शिकवण्याचे काम केले. या पंचक्रोशीत फिरून त्यांनी हरळ, पाटकरवाडी, करक, आंबा येथे शाळा चालवण्याचा प्रयत्न केला. या कमी त्यांना अण्णा रेडीज, अण्णा लब्दे, अण्णा वायकुळ, बाबा देसाई, ज्ञानदेव नारकर, राजाराम खामकर, येळवणचे महादेव मलुष्टे असे अनेक सहकारी तन-मन-धनाने मदत करू लागले आणि या कार्यात सहभागी झाले. सातवी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण मुलांना पाचलमध्ये मिळावे यासाठी आबांनी खूप कष्ट घेतले. प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर मुलांना पुढील शिक्षण घेता येत नाही हे पाहून आबांनी १९५५ मध्ये 'पाचल पंचक्रोशी शिक्षण मंडळाची ' स्थापना केली. पाचल सारख्या ठिकाणी हायस्कूल काढण्याची आबांची कल्पना राजापूर सारख्या शहरातील लोकांना हास्यास्पद पण वाटत होती. पण आबा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनंत अडचणीवर मात करत पाचलला हायस्कूल सुरू केले आणि आज ते राजापूर तालुक्यातील एक नामांकित हायस्कूल म्हणून ओळखले जाते. आर्थिक अडचणी खूप मोठ्या प्रमाणात असतानाही आबांनी या सगळ्यातून मार्ग काढला.

**स्त्री शिक्षण आणि मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी प्रयत्न**

आबांनी शिक्षणासाठी स्त्रिया आणि मागासवर्गीय मुलांमध्ये जनजागृती करून त्यांना या प्रवाहात आणले. स्त्रियांना त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध जागृत करून त्यांच्यात आत्मभान निर्माण केले.

मागासवर्गीय व्यक्तीला पोलीस पाटील करून त्याची गावातून मिरवणूक काढणारा आबांसारखा पुरोगामी विचाराचा सेनानी विरळा असावा. मुलींना सातवीच्या परीक्षेला रत्नागिरीला जावे लागत होते तर त्यांची राहण्याची व्यवस्था आबा स्वतः तिथे जाऊन करत असत. आबांची अशी स्त्रिया आणि मागासवर्गीय यांच्याकडे बघण्याची नवी दृष्टी होती. स्त्रियांनी आत्मनिर्भर व्हावे यासाठी त्यांनी



आबांनी महात्मा गांधींचा खेड्याकडे चला हा महामंत्र जपला आणि ते आपल्या पंचक्रोशीत आले. पाचलसारख्या ग्रामीण भागात ६ मे १९३७ साली त्यांनी ग्रामसेवा संघाची स्थापना केली. १ जानेवारी १९४३ ला मठात दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. तर १ मार्च १९४३ ला वाचनालय रजिस्टर झाले. पुढे १२ डिसेंबर १९४६ रोजी आबांनी 'पाचल गट विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी' ही पाचल, करक, कारवली, येरडव, पांगरी खुर्द, हरळ व रायपाटण अशा सोसायटीच्या कार्यक्षेत्रातील गावांना घेऊन सुरू केली. या सोसायटीत गृहवस्तू भांडार, कापड विभाग, चर्मोद्योग विभाग, औषधे विभाग असे विविध विभाग होते. १७ डिसेंबर १९६० रोजी आबांनी श्री सहकारी बौद्धजन सोसायटीची स्थापना केली. पुढे सामुदायिक शेती करण्याचे प्रयोगही आबांनी केले. पुढे २४ ऑक्टोबर १९७१ रोजी आबांनी 'अर्जुना परिसर कृषी उद्योग सहकारी संस्था' स्थापन केली. आबांनी असे विविध सहकारी संस्थांचे जाळे विणून समाजातील सर्वच घटकांची उन्नती साधण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष**

पाचल परिसरात स्वातंत्र्य चळवळ गतिमान करण्याचे काम आबा नारकर यांनीच केले. आबांनी खूप मोठा कालावधी पोलिसांना चकवा देत भूमिगत राहूनच या परिसरातली चळवळ गतिमान केली. आबांनी समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सदैव प्रयत्न केले. आबांनी स्त्री सक्षमीकरण आणि स्त्री शिक्षण या गोष्टीसाठी सदैव प्रयत्न केले. आबांनी जातीयते विरुद्ध आणि खोतीविरुद्ध आवाज उठवत सर्वसामान्यांना न्याय मिळवून दिला. आबांनी कविता लिहून, न्यूज बुलेटीन वाटून प्रबोधनाचे व प्रसाराचे काम मोठ्या प्रमाणात केले. आबांनी पाचल परिसरात सहकारी संस्था काढून सहकाराची चळवळ वृद्धिगत केली. आबांनी पाचल परिसरात शैक्षणिक संस्था काढून या परिसराच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न केले. आबांनी गांधी विचारांचा सदैव प्रसार केला. आबांच्या विचारांवर समाजवादी विचारांचाही प्रभाव राहिला.

**संदर्भ**


१) सह्यगिरीतील गांधी, स्नेहल नेने, त्रिमिती ग्राफिक्स, पुणे, प्रथम आवृत्ती दि.२२ डिसेंबर २०१३, पान. नं.७१

२) सह्यगिरीतील गांधी, स्नेहल नेने, त्रिमिती ग्राफिक्स, पुणे, प्रथम आवृत्ती दि.२२ डिसेंबर २०१३, पान. नं.८१, ८२

३) सह्यगिरी वार्षिकांक २०१२-१३

४) मी अण्णा, अनिरुद्ध शेट्टे, कोकणस्थ वैश्य समाज मुंबई प्रकाशित, प्रथम आवृत्ती ७ मार्च २००९.


IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS &